# १. ससीक-रक्षण

– म्हाइंभट

**परिचय** – *म्हाइंभट (अंदाजे तेरावे शतक उत्तरार्ध)*

*म्हाइंभट यांचा अहमदनगर जिल्ह्यातील सराळे येथे गर्भश्रीमंत ब्राह्मण कुटुंबात जन्म. महानुभाव संप्रदयातील विद्वान गृहस्थ. 'लीळाचरित्र' या मराठी भाषेतील आद्य गद्य ग्रंथाचे कर्ते. त्यांनी नागदेवाचार्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रस्तुत ग्रंथ पूर्ण केला. तो एकांक, पूर्वार्ध आणि उत्तरार्ध अशा तीन भागात विभागलेला आहे. या ग्रंथामध्ये 'लीळां'च्या माध्यमातून म्हाइंभटांनी श्रीचक्रधरस्वामींचे चरित्र रेखाटले आहे.*

*'ससीक-रक्षण' या लीळेतून श्रीचक्रधरस्वामींनी सशाचे रक्षण करून सशाला पकडण्यासाठी पैज लावणाऱ्या पारध्यांना अहिंसेचे महत्त्व विशद केले आहे. ही लीळा अत्यंत हृदयस्पर्शी आहे.*

---

गावीं एकी व्रक्षाखालि आसन : तव पारधी वाटे ससा सोडीला : तयापाठीं सुणीं सोडिलीं : काकूळती येउनि ससा जानूतळि रीगाला : सूणी उभी राहिली : मागीलकडौनि पारधी आले : तेहीं वीनवीलें : 'ससा सोडीजो जी': सर्वज्ञें म्हणीतलें : 'हा एथ सरण आला' : पुडती तीहीं म्हणीतलें : 'जी जी : हा होडेचा ससा जी : याकारणें सूरीया काढणीया होती : जी जी : हा सोडावा जी': एकी वासना : 'कलि लागैल जी : ससा सोडीजो जी :' ।। सर्वज्ञें म्हणीतलें : हां गा : एथ सरण आलेया काइ मरण असे ? : 'जी जी : तरि हा गोसावीं राखीला' : ।। रामेश्वरबास : निरूपण केलें : 'हां गा : ए रानीं असति : पाणी पीति : यातें तुम्हीं कां मारा?' तीहीं म्हणीतलें : 'जी जी : आजिलागौनि न मारूं' ।। मग ते निघाले : सर्वज्ञें म्हणीतलें : 'माहात्मे हो ! आतां जाए!' ऐसें भणौनि जानु उचलिली : मग ससा निगाला ।।

♦♦♦

**शब्दार्थ:**

**ससीक** – ससा, **रीगाला** – बसला, **जानु** – मांडी, **सूणी** – कुत्री, **होडेचा** – पैजेचा.

*संदर्भ : लीळा-चरित्र एकांक, संपा. डॉ. यू.म. पठाण*
*समर्थ प्रकाशन, औरंगाबाद.*



Scanned with OKEN Scanner

# २. साहुकार म्हणजे राज्याची शोभा

**– रामचंद्रपंत अमात्य**

---

**परिचय –** *रामचंद्रपंत निळोपंत अमात्य (बावडेकर) (अंदाजे इ.स. १६५०–१७३३). छत्रपती शिवाजी राजांच्या अष्टप्रधान मंडळातील रामचंद्रपंत अमात्य बावडेकर हे एक प्रमुख व्यक्ती. इ.स. १६७४ मध्ये शिवाजी राजेंनी आपल्या राज्याभिषेकसमयी रामचंद्रपंतांची नेमणूक केली.*

*रामचंद्रपंत अमात्य हे राजनीतीवरील 'आज्ञापत्र' या प्रसिद्ध ग्रंथाचे कर्ते. 'आज्ञापत्र' हा शिवशाहीतील राजनीतीचे निरुपण करणारा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ होय. राजारामास राजसबाईपासून झालेला मुलगा श्री राजा शंभुछत्रपती हा कोल्हापूरच्या गादीवर बसल्यानंतर त्याच्या आज्ञेवरून रामचंद्रपंत अमात्य यांनी हे 'आज्ञापत्र' इ.स. १७१५–१६ च्या सुमारास लिहिले. यामध्ये एकूण नऊ प्रकरणे आहेत. यामधील पाचवे प्रकरण 'साहुकार म्हणजे राज्याची शोभा' हे आहे.*

*प्रस्तुत पाठात स्वराज्यात सावकारांचे काय स्थान आहे, याविषयी अत्यंत बहारदार विवेचन आलेले आहे.*

---

साहुकार म्हणजे राज्याची व राजश्रीची शोभा. साहुकाराच्या योगानें राज्य आबादान[१] होतें. न मिळे त्या वस्तुजात राज्यांत येतात. तें राज्य श्रीमंत होतें. पडलें संकटप्रसंगी पाहिजे तें कर्जवाम मिळतें. तेणेंकरून आले संकट परिहारिजेतें. साहुकाराचे संरक्षणामध्यें बहुत फायदा आहे. याकरितां साहुकाराचा बहुमान चालवावा. कोणेविषयीं त्याजवर जलाल[२] अथवा त्याचा अपमान होऊं न द्यावा. पेठापेठांत दुकानें, वखारी घालवून हत्ती, घोडे, जरमिना[३], जरबाब[४], पशमी[५] आदिकरून वस्त्रजात, रत्नें, शस्त्रें, आदिकरून अषेश वस्तुजात यांचा उदाम[६] चालवावा. हुजूरबाजारामध्येंही[७] थोरथोर साहुकार आणून ठेवावे. वर्षसंबंधें तसेच लग्नादि महोत्सावीं त्यांचे त्यांचे योग्यतेरूप प्रतिष्ठेनें बोलावून आणून वस्त्रपात्र देऊन समाधान करीत जावें. परमुलखीं जे जे साहुकार असतील त्यांचीं समाधानें करून आणावें. त्यांस अनुकूल न पडेच तर असतील तेथेंच त्यांचें समाधान रक्षून आपली माया लावून त्यांचे मुतालिक[८] आणून त्यांस अनुकूल जागा, दुकानें देऊन ठेवावें. तसेच दर्यावर्दी साहुकार यांसही बंदरोबंदरीं कौल[९] पाठवून अमदरफ्ती[१०] करावी. साहुकारांमध्यें फिरंगी व इंग्रज व वलंदेज व फरासीस[११] व डिंगमारादि[१२] टोपीकर हेही लोक सावकारी करितात. परंतु ते वरकड सावकारांसारखे नव्हेत.



Scanned with OKEN Scanner

यांचे खावंद[१३] प्रत्येक प्रत्येक राज्यच करीत आहेत. त्यांचे हुकुमानें त्यांचे होत्साते हे लोक या प्रांतीं साहुकारीस येतात. राज्य करणारास स्थळलोभ नाहीं असें काय घडों पाहतें? तथापि टोपीकरांस, या प्रांतीं प्रवेश करावा, राज्य वाढवावें, स्वमतें प्रतिष्ठावीं, हा पूर्णाभिमान. तदनुरूप स्थळोस्थळीं कृतकार्यही झाले आहेत. त्यास ही हट्टी जात, हातास आलें स्थळ मेल्यानेंही सोडावयाचे नव्हेत. यांची आमदरफ्ती आले गेले इतकीच असों द्यावी. त्यांस केवळ नेहमीं जागा देऊं नये. जंजिऱ्यासमीप तों या लोकांचे येणें जाणें सहसा होऊं देऊं नये. कदाचित् वखारीस जागा देणें झाली तर खाडीचे मोबारीं[१४] समुद्रतीरीं न द्यावी. तसे ठिकाणीं जागा दिल्यानें जोपर्यंत आपले मर्यादेनें आहेत तों आहेत, नाहीं ते समयीं आरमार, तोफा दरुगोळी हेंच त्यांचें बळ, आरमार पाठीशीं देऊन त्यांचें बळें त्या बंदरीं नूतन किल्लाच निर्माण करणार, तेव्हां इतकें स्थळ राज्यांतून गेलें. याकरितां जागा देणेंच तर लांब खाडी, गांव दोन गांवे राजापुरासारखीं असेल तेथें फरासीसांस जागा दिला होता, त्या न्यायें दोन चार नामांकित थोर शहरें असतील त्यांमध्यें जागा द्यावा. तो असा कीं, नीच जागा, शहराचे आवारीं.[१५] शहराचा उपद्रव चुकवून नेमून देऊन वखारी घालाव्या. त्यास इमारतींचे घर बांधों देऊं नये. याप्रकारें राहिलें तर बरें, नाहीं तर याविणें प्रयोजन नाही. आले गेले असून त्यांचे वाटेस आपण न जावें, आपले वाटेस त्यांणीं न जावें; इतकेच पुरें. गलिमाचे मुलुखांतील गलिमाचा मुलूख मारिल्यामुळें अथवा दर्यावर्दीमुळें साहुकार सांपडले तर अवसर पाहून त्यांशीं खंड करावा. खंडाचा वसूल घेणें तोही त्यांस राखून घ्यावा. खंड फारीक[१६] झाल्यावर थोडीबहुत त्यांची मेहमानी[१७] करून बहुमानें त्यांस त्यांचे स्थळास पाठवून द्यावें. गलिमाकडील सेवक लोकांस जें शासन आहे तें साहुकार लोकांस उचित नाहीं.

◆◆◆

**शब्दार्थ:**

१. सुसंपन्न. २. जुलूम. ३. रेशमी वस्त्र. ४. भरजरी वस्त्र. ५. लोकरी वस्त्र. ६. व्यापार. ७. मुख्य बाजार. ८. प्रतिनिधी. ९. निमंत्रण. १०. ये-जा. ११. फ्रेंच. १२. डॅनिश. १३. मालक. १४. तोंडी. १५. गावठाणात. १६. चुकता. १७. आतिथ्य.

*संदर्भ : आज्ञापत्र, संपादक डॉ. प्र. न. जोशी,*
*व्हीनस प्रकाशन, पुणे*



Scanned with OKEN Scanner

# ३. भावी जीवनाची उभारणी विद्यापीठात होते...

**– डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

---

***परिचय** – डॉ. भीमराव रामजी आंबेडकर (इ.स.१८९१–१९५६).*

*ज्ञाननिष्ठेचा वैश्विक आदर्श, मानवतेचे दीपस्तंभ, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, इतिहास संशोधक, धर्म चिकित्सक, वंचितांच्या उद्धारासाठी आयुष्य समर्पित करणारे महामानव. अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव कोरले आहे.*

*विधीशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र इत्यादी ज्ञानशाखांमधील विशारद, साक्षेपी मीमांसक, सद्सद्विवेकवादी जगद्विख्यात प्रज्ञावंत, बहुजनांच्या दुःखाला वाचा फोडणारे पत्रकार, समताधिष्ठित समाजरचनेचे जनक, विश्वविख्यात कायदेपंडित म्हणून प्रसिद्ध. मरणोत्तर 'भारतरत्न' पुरस्काराने सन्मानित.*

*इ.स.१९४२ मध्ये व्हॉइसरॉय कौन्सिलमध्ये ते मजूरमंत्री, स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात कायदेमंत्री होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे 'जनता', 'समता', 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'प्रबुद्ध भारत' इत्यादी नियतकालिकांचे संस्थापक संपादक होते. त्यांचे 'कास्टस् इन इंडिया', 'हू वेअर द शूद्राज', 'थॉट्स ऑन पाकिस्तान', 'बुद्ध अँड हिज धम्म', 'प्रॉब्लेम ऑफ रूपीज' इत्यादी ग्रंथ प्रसिद्ध आहेत.*

*प्रस्तुत पाठ म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये केलेले भाषण होय. यातून डॉ. आंबेडकरांचे उच्च शिक्षणविषयक विचार नेमक्या शब्दांत व्यक्त झाले आहेत.*

---

एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये सोमवार, दि. १५ डिसेंबर, १९५२ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण आयोजित करण्यात आले होते. ते आपल्या भाषणात म्हणाले,

या कॉलेजात मी जी चार वर्षे अध्ययन केले तो काळ मोठा गोड स्मृतींचा नाही. मी या कॉलेजातील पहिलाच अस्पृश्य विद्यार्थी होतो. माझे मन सवर्ण विद्यार्थ्यांत मिसळायला धजत नव्हते. म्हणजे भीतीमुळे नव्हे, मलाच ते मिसळणे आवडत नव्हते. कारण माझा पोषाख इतरांसारखा झकपक नव्हता व त्यामुळे त्यांच्यापासून दूर राहाणेच मला आवडत असे. आजकालच्या विद्यार्थ्यांसारखे माझे कॉलेज जीवन तेवढे उत्साही नव्हते याबद्दल मी कुणालाच दोष देत नाही.

माझ्या शिक्षकांनी व विद्यालय चालकांनी मला ठीक वागवले. त्या वेळच्या विद्यार्थ्यांत आणि आजच्या विद्यार्थ्यांत जमीन अस्मानचा फरक आहे.

आजचे विद्यार्थी ज्या विद्यापीठाचे शिक्षण घेतात त्याच्या कारभाराकडे मुळीच लक्ष घालीत नाहीत. विद्यार्थ्यांनी काय शिकावं हे विद्यापीठ ठरवित असले तरी आपल्या बौद्धिक विकासाला आपण शिकतो ते खरोखरच पोषक व आवश्यक आहे की नाही. हेही प्रत्येक विद्यार्थ्याने पाहिले पाहिजे. त्यांच्या भावी जीवनाची उभारणी याच ठिकाणी होत असते. तो राष्ट्राचा आदर्श नागरिक होणार की, त्याचे जीवित विफल होणार हेही शिक्षणक्रमच ठरविणार असल्यामुळे विद्यापीठाच्या प्रत्येक हालचालीवर विद्यार्थ्यांचे कटाक्षाने लक्ष पाहिजे. पण आजचे विद्यार्थी त्या दृष्टीने अगदी बेपर्वा असतात.

उच्च विद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या या विद्यार्थ्यांची कॉलेजची चार वर्षे संपून जातात आणि विद्यापीठाच्या पदव्या घेऊन ते बाहेर पडतात. पण त्यांना प्लेटो, बेकन, नित्से, स्पिनोझा यासारख्या महाश्रेष्ठ तत्त्वज्ञान्यांच्या तत्त्वज्ञानासंबंधी अवाक्षरही माहिती नसते. ज्या तत्त्वज्ञानाने नव्या जगाची उभारणी केली किंबहुना आजचा नव मानव आपल्या प्रत्येक दैनंदिन जीवनात ज्या तत्त्वज्ञानावर जगत आहे, त्या थोर तत्त्वज्ञानाची उपेक्षा आजच्या पदवीधरांकडून व्हावी यापेक्षा अति लाजिरवाणी गोष्ट कोणती? याउलट आजची विद्यापीठे जेम्स आणि चार्लस यांचे तत्त्वज्ञान विद्यार्थ्यांच्या माथी जबरीने लादत आहेत. विद्यार्थ्यांनी या गोष्टी स्वत:च ओळखायला पाहिजेत आणि आपल्याला योग्य शिक्षण पाहिजे याची हाकाटी त्यांनी केली पाहिजे.

मानवी जीवनातील वैचारिक आणि नैतिक मूल्ये कधीच स्थिर राहिली नाहीत. ती कालमानाप्रमाणे प्रत्यही बदलत राहतात. नुसती बदलतातच नव्हे तर ती प्रगत होत जातात. भारतीय विद्यार्थ्यांनीही या नव्या नव्या निर्माण होणाऱ्या जीवनमूल्यांची दखल घेतली पाहिजे आणि आपणही ती आचरणात आणण्यास सिद्ध राहिले पाहिजे. हे नवे तत्त्वज्ञान आपल्या विद्यादायी संस्था आपल्या शिक्षणक्रमात घालतात की नाही याकडेही पाहिले पाहिजे.

पण खेदाची गोष्ट ही की, आधुनिक विद्यार्थ्यांची बौद्धिक आणि वैचारिक पातळी रोडावत खाली चाललेली आहे. भूतकालातील मानवी प्रज्ञेशी तुलनाच होऊ शकत नाही. ही बौद्धिक पातळी का खाली घसरली ह्याचा विद्यार्थ्यांनी विचार करणे आवश्यक आहे आणि या परागतीचे कारण अगदी स्पष्ट आहे. आजचा विद्यार्थी वर्ग भूतकालीन प्रज्ञावंत आणि प्रतिभावंत यांच्या तत्त्वज्ञान व वाङ्मयकृतींचा अभ्यास मन लावून करीत नाही.

उलटपक्षी आजचा विद्यार्थी वर्ग फुटबॉल, क्रिकेट आणि पोकळ राजकारणात



Scanned with OKEN Scanner

दंग असतो. विद्यार्जन याला एक मोठा अर्थ असतो. आपली प्राचीन गुरुकुले एकांतात विद्या शिकवीत असत. रानावनातून ही विद्यापीठे प्रस्थापित झाली होती. त्याचे मुख्य कारण असे की, त्यांना विद्येच्या अभ्यासाने नवी दृष्टी यावी. या दृष्टीतून त्यांनी खऱ्या जीवनमूल्यांचा शोध व बोध घ्यावा. पण आजचे विद्यार्थी क्रीडेच्या आणि राजकारणाच्या फंदात ती दिव्य दृष्टी करून घेतच नाहीत.

हिंदी विद्यालयातील शिक्षक मोठ्या कष्टाने, केवळ अंगीकारले आहे म्हणून विद्यादान करीत असतो. स्वयंप्रेरणेने हे विद्यादान होत नाही. शिक्षकाला लागणारी अंत:स्फूर्ती, विद्यादानाची हौस आणि त्यासाठी करावा लागणारा अव्याहत व्यासंग या सर्वांचीच त्यांच्याकडे वानवा असते. किंबहुना अध्यापक पेशाला जे नोकरीचे हिडीस स्वरूप आले आहे आणि तास भरून काढण्यासाठीच त्याला शिकवावे लागत असल्यामुळेच अध्यापक वर्गामध्ये हे शैथिल्य निर्माण झाले असावे! व त्यामुळे अध्यापकही विद्यार्थ्यांना विचारप्रवर्तक ज्ञान पाजण्यास असमर्थ झाले आहेत.

विद्यालयांनी आपल्या फी भरमसाट वाढविल्या आहेत. या फी अशाच वाढू लागल्या तर विद्यार्थ्यांच्या भावी जीवनावर त्याचा निश्चितपणे अनिष्ट परिणाम होईल. त्यांचे भवितव्य भयाण होईल. केबन म्हणतो, 'Knowledge is Power' ज्ञान ही महान शक्ती आहे. विद्यार्थी वर्गाला जर या ज्ञानाची कास धरून आपल्या देशाचा विकास आणि उद्धार करून घ्यायचा असेल तर त्यांनी विद्यापीठाच्या कारभारात जरूर लक्ष घालून आपल्या हक्कांसाठी सतत झगडत राहिले पाहिजे.

विद्यापीठाचा कारभार हाकणारी सिनेटमध्ये बसलेली ही क्रियाशून्य जुनी धेंडे गेल्याशिवाय विद्यापीठाचा कारभार सुधारणार नाही. उलट या जुन्या धेंडांकडूनच विद्यापीठात उघड लाचलुचपतीचे प्रकार सुरू आहेत. सिनेटमधल्या सभासदाकडील शिक्षणसाहित्य किंवा शास्त्रीय उपकरणे खरेदी करण्याच्या अटीवरच एखाद्या नव्या शाळेला किंवा कॉलेजला मान्यता मिळते. म्हणून विद्यार्थ्यांनीच विद्यापीठाचा कारभार जातीने पाहिला पाहिजे व आपले हित साधले पाहिजे.

♦♦♦

*संदर्भ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे,*
*महाराष्ट्र शासन, खंड १८, भाग ३*

# ४. क्रीडासंस्कृतीची गरज

**– डॉ. नरेंद्र दाभोलकर**

---

***परिचय** – डॉ. नरेंद्र अच्युत दाभोलकर (इ.स.१९४५-२०१३).*

*सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दाभोली हे मूळ गाव. परंतु साताऱ्यातील माहुली या गावी जन्म. १९८९ साली समविचारी कार्यकर्त्यांच्या विचाराने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना. अंधश्रद्धेविरोधी आयुष्यभर लढा. बाबा आढावांच्या 'एक गाव एक पाणवठा' या सामाजिक चळवळीत सहभाग. साने गुरुजींनी सुरू केलेल्या साधना साप्ताहिकाचे २००६ पासून ते मृत्यूपर्यंत संपादक.*

*राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरचे उत्तम कबड्डीपटू. शिवछत्रपती युवा पुरस्कार, अंनिसमधील कार्याबद्दल देश-विदेशातील विविध पुरस्काराने सन्मानित. भारत सरकारचा 'पद्मश्री' (मरणोत्तर) पुरस्कार.*

*'अंधश्रद्धा प्रश्नचिन्ह आणि पूर्ण विराम', 'अंधश्रद्धा विनाशाय', 'ऐसे कैसे झाले भोंदू', 'झपाटलेले ते जाणतेपण' (सहसंपादित), 'ठरलं... डोळस व्हायचंय', 'तिमिरातुनी तेजाकडे', 'प्रश्न मनाचे' (सहलेखक), 'भ्रम आणि निरास', 'मती भानामती' ( सहलेखक), 'विचार तर कराल', 'विवेकाची पताका घेऊ खांद्यावरी', 'श्रद्धा-अंधश्रद्धा' इत्यादी ग्रंथ प्रकाशित.*

*प्रस्तुत लेखात आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंची निम्न कामगिरी आणि क्रीडा संस्था तसेच सरकार यांचे त्याकडे होणारे दुर्लक्ष याबाबत प्रकाशझोत टाकला आहे. तसेच आपल्या देशात क्रीडासंस्कृती रुजविण्याची गरज प्रकट केली आहे.*

---

अथेन्स ऑलिंपिक्समध्ये भारताच्या वाट्याला काय येईल?

एखाद-दुसरे कांस्यपदक म्हणजे आनंद. एखादे सुवर्णपदक लाभले तर जणू आभाळालाच हात लागले. शंभर कोटींची लोकसंख्या कधीच मागे टाकणाऱ्या महान राष्ट्राला इतके लहान यश का लाभावे, याची चर्चा प्रत्येक वेळेप्रमाणे काही काळ झडेल. राजकारण, भ्रष्टाचार, पैशाची कमतरता, प्रशिक्षणाचा अभाव असे तेच ते मुद्दे आणि त्यावरचे तेच ते उपाय उगाळले जातील. पुन्हा पुढच्या ऑलिंपिक्सपर्यंत सारे काही शांत शांत होईल. या चर्चेत तथ्यांश नाही, असे नाही, पण सर्वाधिक महत्त्वाचा पायाभूत मुद्दा या गदारोळात चर्चेला येत नाही; आणला जात नाही. त्यासाठी दूरगामी दृष्टीने दीर्घकाळ परिश्रम करणे तर दूरच राहिले.



Scanned with OKEN Scanner

खेळाचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी लक्षावधी लोक ज्या वेळी उत्साहाने मैदानावर उतरतात त्याच वेळी क्रीडाक्षेत्र बहरते. त्यामधूनच आपल्या देशाच्या वातावरणाशी, आर्थिक वकुबाशी सुसंगत अशा काही खेळांसाठी, क्रीडासंस्कृती तयार होते. यासाठी गरज आहे जास्तीतजास्त लोक मन:पूर्वकतेने मैदानाकडे वळण्याची. या उलट टीव्हीसमोर सामना बघत तासन्‌तास बसणे, फुकटची चर्चा, वांझ संताप वा जल्लोष हेच कोट्यवधी भारतीय आज पसंत करतात.

तालुका पातळीपर्यंत स्टेडियम बांधून क्रीडासंस्कृती रुजत नाही. त्या स्टेडियमवरची मैदाने लोकांच्या खेळाने खळाळून वहावयास हवीत. स्वाभाविकच खेळही असे हवेत जे या देशातल्या आम लोकांना परवडतील. क्रिकेट अनभिषिक्त सम्राट आणि बाकीचे सर्व खेळ जणू तिय्यम दर्जाचे मानकरी अशी आजची स्थिती आहे. इथल्या शाळकरी मुलाला मागच्या एशियाडमध्ये सुवर्णपदक मिळवलेल्या भारतीय खेळाडूचे नावही ठाऊक नसते; पण साधे रणजी सामने खेळणाऱ्या क्रिकेट खेळाडूंच्या सनावळ्या पाठ असतात. पण जगातले डझनभरही देश न खेळणारा हा महागडा खेळ माझ्या देशाच्या क्रीडासंस्कृतीचा पाया कसा बनेल? या वेळच्या ऑलिंपिक्समध्ये शूटींग व टेनिस या स्पर्धेतील खेळाडूंकडून भारताला पदकांची अपेक्षा आहे. हे भरपूर खर्चिक खेळ या देशातील लाखातील एखाद्यालाही परवडणारे नाहीत.

दारिद्र्याने ग्रासलेल्या, मागासपणाने वेढलेल्या इथोपिया, केनिया यासारख्या देशांनी अनेक वेळा ऑलिंपिक्समध्ये सर्वाधिक खडतर मानली जाणारी मॅरेथॉन स्पर्धा जिंकली आहे. पायात खेळाचे बूटही नसलेले हे स्पर्धक सुवर्णपदक विजेते कसे झाले? पळण्याचा आनंद मनमुराद लुटणे हा त्यांच्या राष्ट्रीय क्रीडासंस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. पळणे या क्रीडाप्रकारावर प्रेम करणारे देशवासीय गावच्या रस्त्यावरून नव्हे तर डोंगराच्या उतारावरूनही आनंदासाठी पळत असतात. या वातावरणाने भारलेल्या देशाला सुवर्णपदक कितीसे लांब असणार? त्यातही त्याचे शहाणपण असे की, कृत्रिम ट्रॅकची गरज असलेल्या व आपल्या गरीब देशाला न परवडणाऱ्या १००, २००, ४०० मीटर्स अंतराच्या धावण्याच्या स्पर्धेसाठी ते जीव टाकत नाहीत. आपल्या राष्ट्रीय क्रीडासंस्कृतीला साजेशा अशा पाच हजार, दहा हजार मीटर व मॅरेथॉन अशाच धावण्याच्या स्पर्धेसाठी स्वत:ला घडवतात.

भारतातले लोक जास्तीत जास्त खेळतील कसे, हे आपण कुठे पाहतो? आपल्या देशीपणाला साजेशी व सोयीची क्रीडासंस्कृती कोठे घडवतो? ही संस्कृती एक राष्ट्रीय निर्धार म्हणून आपल्याला घडवावी लागेल. शिक्षणसंस्था, राजकीय-सामाजिक धुरीण यांबाबत प्रभावी भूमिका बजावू शकतात. प्रसारमाध्यमांनी आपली सारी प्रतिभा प्रायोजकाकडे गहाण टाकण्याचा विकाऊपणा काही प्रमाणात



Scanned with OKEN Scanner

तरी कमी करावयास हवा. खेळाच्या आनंदाचा रसरसता स्पर्श शाळेत जाणाऱ्या वा न जाणाऱ्या सर्वांना लाभावा, असे वातावरण हवे. सोय हवी. कुमारवयातली ही पिढी तारुण्यात पदार्पण करताना तो आनंद समाजात घेऊन जाईल, प्रसारमाध्यमे या क्रीडासंस्कृतीला आकर्षकपणा प्राप्त करून देतील, असे घडावयास हवे. या अपेक्षेपेक्षा आजचे चित्र नेमके उलटे आहे. स्वतःच्या संकुचित हितसंबंधासाठी जसे पक्ष काढले व वापरले जातात, त्याच पद्धतीने खेळाच्या असोसिएशन निघतात. बीच हॉलिबॉल व तायकोंदो भारतात कुठे आणि किती प्रमाणात खेळला जातो? पण त्या खेळाच्या असोसिएशनला भारतीय पातळीवर मान्यता दिली, की ती देणाऱ्यांच्या बाजूचे एक मत क्रीडा क्षेत्रातील शिखर राजकारणासाठी पक्के होते. त्या असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनाही कधीतरी ऑलिंपिक्सला पाय लावावयास मिळणार या कल्पनेने धन्य धन्य वाटते. यामधूनच भली मोठी पथके ऑलिंपिक्सला जातात आणि रिकामे हात हलवत परत येतात.

या देशात एक फार मोठा जनसमूह असा आहे की, ज्याच्या जीवन-कौशल्याची अभिव्यक्ती या देशाच्या संस्कृतीच्या सन्मानाचा भाग कधी झाला नाही. लिंबाराम हा आदिवासी. थोडी संधी मिळाली तर त्याने धनुर्विद्या या क्रीडा प्रकारात ऑलिंपिक्सपर्यंत धडक मारली. निसर्गाने ज्याला पळण्याची तिप्पट क्षमता दिली अशा धावत्या जनावरामागे पळून त्याला पकडणारा फासेपारधी, अद्भुत लवचिकतेचा खेळ दाखवणारी रस्त्यावरच्या डोंबाऱ्याची पोर यांची गुणवत्ता वादातीत आहे. त्यांना नीटपणे हेरले, संधी, प्रशिक्षण, हिंमत दिली तर पळण्याच्या वा जिम्नॅस्टिकच्या स्पर्धेत देशाची मान ते उंचावतील अशी अपेक्षा निश्चित बाळगता येईल. पण त्यासाठी हवे आहे वेगळ्या क्रीडासंस्कृतीचे भान. क्रीडासंस्कृती याचा अर्थ केवळ खेळाचा प्रसार नाही. तो तर आहेच; पण आजच्या विशेषज्ञांच्या युगात स्पोर्टस् फोटोग्राफी, स्पोर्टस मेडिसिन, स्पोर्टस् जर्नालिझम अशा जवळपास चाळीस शाखा तयार झाल्या आहेत. त्याचीही वानवाच आपल्याकडे आहे. हेदेखील क्रीडासंस्कृती निर्मितीला प्रतिकूलच.

क्रीडास्पर्धेत यशस्वी होण्यासाठी क्रीडासंस्कृती जोपासावी लागते. त्यामध्ये उत्तम देखण्या इमारती, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयी, देशी-विदेशी उत्तमोत्तम प्रशिक्षक हे सारे येते, पण नंतर येते. प्रथम येते ती आपल्या देशातील वातावरणाशी सुसंगतपणे 'चला खेळूया' ही कोट्यवधींच्या मनामनात फुलणारी आणि सगुण साकार होणारी इच्छा. ती निर्माण झाली तर ऑलिंपिक्समधील यश पायघड्या घालत आपल्या पावलांनी आपोआप चालत येईल.

◆◆◆

*संदर्भ : साप्ता. साधना, ७ ऑगस्ट २००४, वर्ष ५६, अंक ५०.*

# ५. पदरी पडलं पवित्र झालं!

4

**– हिंमतराव बावस्कर**

**परिचय –** *डॉ. हिंमतराव सलुबा बावस्कर (जन्म १९५० दशकाच्या प्रारंभी). महाराष्ट्रातील जालना जिल्ह्यातील देहेड गावात गरीब कुटुंबात जन्म. बालपणीचे नाव 'धैर्यवान'. परंतु जिद्द, चिकाटी व धाडसी गुणांमुळे पुढे 'हिंमतराव' नाव धारण. कठोर परिश्रमातून अशक्य ते शक्य करत वैद्यकीय डॉक्टरचे स्वप्न साकार. आरोग्यसेवेच्या माध्यमातून समर्पित भावनेतून सेवा, प्रामाणिक व कुशल डॉक्टर म्हणून नावलौकिक.*

*पूर्वी विंचवाच्या दंशाने रोग्याला असह्य वेदना व्हायच्या. डॉ. बावस्करांनी रोग्याचे सूक्ष्म निरीक्षण करून त्यावर रामबाण औषध तयार केले. नंतरच्या काळात नाग, कोब्रा, वाइपर व क्रेट आदी विषारी सापांच्या दंशावर प्रभावी व परिणामकारक औषध शोधले. त्यांचे सध्या मुंबईपासून जवळच असलेल्या महाड शहरात वैद्यकीय सेवा व संशोधन कार्य सुरू आहे.*

*'द लॅनसेट' या वैद्यकीय क्षेत्रातील इंग्रजी आंतरराष्ट्रीय नियतकालिकात अनेक शोधनिबंध प्रकाशित. वैद्यकीय विषयावर आधारित अनेक इंग्रजी ग्रंथ तर मराठी भाषेत 'बॅरिस्टरचं कार्टं' आत्मचरित्र प्रकाशित.*

*प्रस्तुत वेचामध्ये लेखकाने आपल्या कष्टप्रद जीवनाचा पट उलगडताना अशिक्षित करतडे आजोबांना शिक्षणाबद्दल असलेले प्रेम, त्यांची निस्वार्थ भावना याबद्दल अत्यंत ओघवत्या शैलीत कृतज्ञता व्यक्त केली आहे.*

---

आईवडिलांनी माझे नाव हिंमतराव ठेवले. या नावाबद्दलचे दोनतीन किस्से सांगण्यासारखे आहेत. माझ्या लग्नाच्या वेळेस ओढूनताणून तयार केलेले जन्मटिपण अंबेजोगाई येथे वधूपक्षाकडे पाठविले. 'हिंमतराव' हे गावठी नाव वाचून प्रमोदिनीने वडिलांकडे शंका काढली. तेव्हा "हा मुलगा शेतकरी कुटुंबातील आहे, त्याचे आईवडील खेडूत असल्यामुळे हे प्रचलित नाव ठेवण्यात आले आहे. परंतु मुलगा हुशार व संशोधक वृत्तीचा आहे," असे वडिलांनी समजावून सांगितले.

माझा धाकटा मुलगा पराग इंग्रजी माध्यमाच्या शाळेत गेला. हजेरीच्या वेळेस शिक्षक 'हिंमतराव' नाव घेत. नाव उच्चारले की, वर्गातील सर्व विद्यार्थी हसत. परागला वाईट वाटत असे व तो नाराज होत असे. हजेरी म्हणजे त्याची एक परीक्षाच होती. तो शरमल्यासारखा होई. त्यानंतर वेळोवेळी वर्गात शिक्षक



Scanned with OKEN Scanner

नाव विचारीत, तेव्हा तो पराग एच. बावस्कर असे सांगत असे व हिंमतराव नाव घेणे टाळत असे. त्याने एकदा मला व त्याच्या आईला विचारले, ''बाबा, असे कसे तुमचे नाव?'' त्यावर मी सांगितले, ''बरे झाले 'हिंमतराव' नाव आईवडिलांनी ठेवले, अन्यथा सांडू किंवा दगडू असते तर फारच पंचाईत झाली असती.''

लंडनला जाण्यापूर्वी माझ्या समव्यावसायिकांनी निरोप देण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. डॉ. नितीन कुद्रीमोती (एम.डी.) यांनी प्रास्ताविक भाषणात सांगितले, ''डॉ. बावस्करांची संशोधनाची हिंमत ही त्यांच्या आईने पाचवीच्या दिवशी पाळण्यात घालताना ओळखली असावी व म्हणूनच त्यांचे नाव योग्यतेप्रमाणे हिंमतराव असे ठेवले असावे.''

अशा या हिंमतरावाचा जन्म रझाकारांच्या दहशतीच्या काळात आई रखमाबाईच्या कुशीत झाला. गावामध्ये बारीकसारीक गोष्टींवरून खूप वादविवाद होत असे. जोरजोराने भांडणे होत. एखादी व्यक्ती जोराने अंगावर धावून गेल्यास ''काय 'रझाकारा'सारखा वागतोस?'' म्हणून इतर मंडळी त्याला हिणवायची. रझाकाराचा म्हणजे अंदाजे १९४८-५० सालचा काळ. हे रझाकार खेड्यात जाऊन बळजबरीने अन्नधान्य व संपत्ती लुटत आणि स्त्रियांवर अत्याचार करीत. आमच्या घरासमोरील सत्तरी ओलांडलेले काशीनाथ जाधव, रात्री उन्हाळ्यात रझाकारांबद्दल त्यांचे अनुभव सांगत. रझाकार गावात आला असे समजले तर कोणीही घराबाहेर पडत नसत. त्यांची इतकी भीती वाटायची की, पोटुशी असलेल्या स्त्रीलाही बाळंतपणाच्या कळा सुरू व्हायच्या, असे ते सांगत. त्यांचा एक अतिशय विचित्र अनुभव त्यांनी कथन केला. एक रझाकार कुटुंबासहित गावामध्ये आसरा घेण्यास आला असता कोणीही त्याला घरात घेत नव्हते. कारण त्याच्या अत्याचारी वागणुकीची सर्वांना कल्पना होती. तरीदेखील तो हात जोडून गावकऱ्यांना विनवणी करू लागला. त्या वेळेस एका गावकऱ्याने एक अट घातली की, 'जर हा रझाकार त्याच्या स्वतःच्या मुलाला आपल्यासमोर कापेल' - ही म्हणजे आपल्यावर केलेल्या अत्याचाराची शिक्षा - तर गावात त्याला आसरा द्यायचा. सर्वांनी ते मंजूर केले व सर्वांसमोर खरोखरच चाकू घेऊन तो मुलाच्या अंगावर धावला. इतर मंडळींनी त्याला आवरले. बायाबापड्यांचे म्हणणे पडले की, 'हा जर स्वतःच्या मुलाची पर्वा करत नाही तर आपले काय?' त्यामुळे कोणीही आसरा न देता सर्वांनी त्याला गावाबाहेर हाकलून दिले. ज्याप्रमाणे काश्मीर हे अतिरेक्यांच्या अत्याचारांनी होरपळून निघत आहे त्यातलाच हा प्रकार.

आईवडील अशिक्षित. जवळपास दवाखाना नसल्यामुळे बाळंतपण घरीच झालेले. त्यामुळे नेमकी जन्मतारीख व वेळ माहीत नाही. आईला वेळ विचारली असता माझी जन्मवेळ पहाटेची (खेड्यातील स्त्रिया भल्या पहाटे साडेतीन ते



Scanned with OKEN Scanner

चार वाजता जात्यावर दळण दळण्यास उठतात) असल्याचे ती सांगे. त्यामुळेच ज्योतिषीदेखील माझे अचूक भविष्य करू शकत नाही, असे वडील नेहमी सांगत. माझा शंभर टक्के विश्वास कर्तव्यावर असल्यामुळे भविष्य पाहण्याची वेळच आली नाही हा भाग वेगळा. माझा जन्म औरंगाबाद (जालना) जिल्ह्यातील पाचशे वस्तीच्या देहेड या गावी पांढऱ्या मातीच्या गढीवर असलेल्या घरी झाला. शिक्षणाचे वारे न लागलेल्या ह्या अशिक्षित कुटुंबात सर्वांत होतकरू व मदत करणारी व्यक्ती म्हणजे माझे वडील.

आई ही अत्यंत कर्तृत्ववान, हिंमतवान, जिद्दी व कष्टाळू होती. कारण आईचे वडील तुळशीराम पाटील हे भोकरदन तालुक्यातील धडाडीचे व्यक्तिमत्त्व होते. ते दगडवाडी या गावचे पोलीस पाटील होते. त्या काळात पाटीलकीला फार महत्त्व होते व त्यांचा गावात फार दबदबा होता. तालुक्यास जाण्यास दळणवळणाचे साधन नव्हते. त्यामुळे ते घोड्यावरून जात असत. माझी आई सर्वात मोठी मुलगी. तीसुद्धा स्वत: घोड्यावर बसून वडिलांबरोबर जात असे. आई आम्हाला सांगत असे की, तिच्या वडिलांनी तिची हिम्मत व घोड्यावर स्वार होऊन दौडण्याची हौस पाहिल्यावर 'मुलाच्या जातीत जन्मली असती तर भोकरदन तालुक्यावर तिने राज्य केले असते', असे ते नेहमी म्हणत.

त्या काळी मुलगी ही वतनदार घराणे पाहून द्यायची अशी प्रथा होती. वतनदार म्हणजे ज्याचे घर गढीवर आहे तो वतनदार. गढी म्हणजे खेड्यातील एक प्रकारचा मातीचा गड. ही सर्व पांढरी माती पूर्वीच्या काळात ज्वालामुखीमुळे तयार झालेली असावी व पूर्वजांपासून वतनदारी यांच्याकडे आली असावी. वतनदार व्यक्तीच्या गरिबीचा वा श्रीमंतीचा विचार करायचा नाही. म्हणूनच आई जरी श्रीमंत कुटुंबात जन्मली होती तरीदेखील तिचा विवाह अतिशय गरिबीत वाढलेले परंतु गढीवरची वतनदारी असलेले श्री. साळुबा बावस्कर यांच्याशी संपन्न झाला.

दारिद्र्य संपता संपेना. रात्रंदिवस कष्ट करूनदेखील कुटुंब सांभाळणे कठीण जात होते. पदोपदी व क्षणोक्षणी आईला गरिबी चाहूल देत होती. त्यामुळे आई वैतागून म्हणायची, ''माझ्या बापाने फक्त गढीचे पांढरे ढेकूळ बघून ह्या दरिद्र्याच्या पदरी घातले.'' माहेरची सर्व श्रीमंती विसरून आईने माझ्या वडिलांस पूर्ण साथ दिली. आई वैतागून नेहमी म्हणायची, ''पदरी पडलं आणि पवित्र झालं.'' हे तिने खरे ठरविले.

माझे आजोबा, माझे वडील लहान असतानाच वारले. त्यामुळे वडिलांचा सांभाळ त्यांचे मामा पाटीलबा करतडे यांनी स्वत: अविवाहित राहून केला. त्यांनी वडिलांना लहानाचे मोठे केले. करतडे आजा म्हणजे आमचे साक्षात गाडगेबाबाच.



Scanned with OKEN Scanner

नि:स्वार्थी बुद्धीने त्यांनी भाच्याचा, स्वत:च्या मुलाप्रमाणे सांभाळ केला. आठ वर्षे सालदारकी करून त्या काळात कमावलेल्या चांदीच्या ऐंशी रुपयांमध्ये आठ एकर जमीन देहेड गावामध्ये खरेदी केली व भाच्याच्या, माझ्या वडिलांच्या नावावर नोंद करून दिली. केवढा उदात्त हेतू! हल्ली वडीलदेखील स्वत:च्या मुलाच्या नावावर संपत्ती करण्यासाठी दहा वेळा विचार करतात. परंतु करतडे आजोबांनी मनात किल्मिष न ठेवता एवढी जमीन भाच्याच्या नावावर केली.

करतडे आजोबा रंगाने इतके काळे होते की काळ्या जमिनीवर पडले तर ओळखूही येणार नाहीत. पण मनाने स्वच्छ होते. अंगावर फक्त धोतर. शर्ट कधीही वापरला नाही. हिशोब येत नसल्यामुळे ते रोज मजुरीला जात असताना किती दिवस मजुरी केली हे समजण्यासाठी मजुरीहून आल्यावर कमरेच्या करदोड्याला त्या दिवशीची आठवण म्हणून एक गाठ मारत. आठ-पंधरा दिवसांनी किती गाठी आहेत, म्हणून माझ्या आईला (भाचेसुनेला) मोजायला लावत व आईला हिशोब करायला सांगत. ज्याप्रमाणे मुंबईला एखाद्या मालकाकडे अशिक्षित चाकरमानी वर्षानुवर्षे जीवन घालवतो, त्यातलाच हा प्रकार होता.

आईवडिलांनी आम्हा भावंडांना बुलढाणा येथे शिक्षणासाठी नेण्याचे ठरविले. बुलढाणा हे जिल्ह्याचे ठिकाण. येथे पायगव्हाणाची दहा बाय सहा फुटाची खोली सहा रुपये भाड्याने घेतली. वडिलांनी करतडे आजोबाला, ''तुम्ही बुलढाण्याला येऊ नका, देहेडला राहा'' असे सांगितले. शहरात खोली लहान व तुमची व्यवस्था होणार नाही असे बजावले.

'भाच्यावर आपले नेहमी लक्ष असले पाहिजे' ही करतडे आज्याच्या मनातील तळमळ राहवली नाही. ते स्वत: बुलढाण्यास आले. त्यांनी जुन्या बुलढाण्यातील श्रीमंत शेतकरी तुकाराम दादा मुठ्ठे यांच्या शेतातील गोठ्यावर त्यांची गुरे सांभाळण्यासाठी मुक्काम ठोकला.

दर आठ दिवसांनी आम्हाला ते भेटण्यास येत असत. विशेष म्हणजे रोज रात्री आलेल्या जेवणातील दोन भाकरीपैकी एक भाकर बाजूला काढून ती उन्हात वाळवून ठेवत असत. अशा तीनचार दिवसांच्या जेवणातील शिल्लक ठेवलेल्या वाळवलेल्या भाकऱ्या आम्हांसाठी आणत. आमची आई ते वाळवलेले भाकरीचे कुटके गुळामध्ये शिजवून देत असे व आम्ही मोठ्या आवडीने खात असू.

करतड्या आज्याचा संसार म्हणजे गोठ्यावर पिण्याच्या पाण्याचे मडके व जेवणासाठी परातीच्या आकाराचे मातीचे भांडे. त्याला 'परोळ' असं म्हणतात.

करतड्या आज्याच्या संसारावरून आठवण झाली मदर तेरेसाची. मदर तेरेसाची संपत्ती म्हणजे एक बादली व साडी एवढीच होती. त्याच्यापुढे आजची माझी स्वत:ची संपत्ती, कपडे बघता लाज वाटते.

करतडे आजोबा शेतातून गावात आमच्या भेटीसाठी येत असताना रस्त्यात पडलेले वर्तमानपत्राचे तुकडे जमा करून आणत असत व घरी आल्यानंतर आम्हाला ते वाचायला लावत. आम्हाला वाचायला येते हे पाहून ते बेहद्द खूष व्हायचे. आपण एका निराळ्या जगामध्ये प्रवास केला आहे असा भाव त्यांच्या चेहऱ्यावर उमटायचा. त्यांच्या चेहऱ्यावरील पाहिलेली खुशी आजही मी विसरू शकत नाही. अजून तरी अशिक्षित व्यक्तींमध्ये शिक्षणाबद्दल एवढे प्रेम असलेला चेहरा मी पाहिलेला नाही. यावरून शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांची शिक्षणप्रेमाची ओढ मी जाणू शकतो.

आईवडील हे माळकरी असल्यामुळे घरामध्ये नेहमी शाकाहारी जेवण असायचे. पण करतडे आज्याला मटण आवडत असल्यामुळे आमची आई वडिलांना चोरून आठ ते पंधरा दिवसांतून एकदा तरी मटण करून आज्याला द्यायचीच.

करतडे आजोबांचे वय जास्त झाल्यामुळे व आजारपणामुळे आई त्यांना देहेड येथे घेऊन गेली. मेंदूचा रक्तपुरवठा कमी झाला व त्यावरील नियंत्रण गेले. जीवनात खूप कष्ट केलेले होते. विहिरीवर मोटेवर व शेतात नांगर हाकलताना, बैलांना आळवताना जे गाणे म्हणत होते, ते गाणे आजारपणात ते मोठमोठ्याने बडबडू लागले. खेड्यातील लोक अशा व्यक्तीला यम लागला असे म्हणतात.

त्यांच्या हातापायाला खूप सूज आली होती. मलमूत्रावरील नियंत्रण गेले होते. खेड्यामध्ये पायावरून सूज आल्यास आता ही व्यक्ती लवकर जाणार असे समजतात. कारण ही सूज क्रोनिक हार्ट फेल्युअरमुळे येते. तसेच आजारपणात चेहऱ्यावर अगोदर सूज आल्यास उलटी सूज आली म्हणतात व अतिशय घाबरतात. कारण वैद्यकीय दृष्टिकोनातून चेहऱ्यावर सूज येणे म्हणजे मूत्रपिंड निकामी होणे. असा रुग्ण लवकर दगावतो. करतडे आज्याला पायाला सूज आली व दीड महिन्यांनी काहीही औषधोपचार न मिळता ते दगावले. शिक्षणरूपी अमृत पाजण्यासाठी व नंतर डॉक्टर होण्यासाठी ज्या करतडे आज्याने जीवनाचे योगदान दिले, त्यांनी आयुष्यभर व शेवटच्या आजारपणात काही औषधोपचार न करता जीवन संपवले. हे करतडे आजोबा वारल्यानंतर अजूनही मला आठवते, जेवढ्या जोराने मी रडलो व मला दुःख झाले, तेवढे दुःख आईवडील वारल्यानंतरही झाले नाही. लहानपणापासून त्यांच्या अंगाखांद्यावर खेळल्यामुळे आईवडिलांपेक्षाही त्यांची जवळीक जास्त होती.

◆◆◆

*संदर्भ : बॅरिस्टरचं कार्टं, डॉ. हिम्मतराव बावस्कर,*
*मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, ठाणे.*



Scanned with OKEN Scanner

4

# ६. आमची आई : साधनाताई

- डॉ. मंदा आमटे

**परिचय** – *डॉ. मंदाकिनी प्रकाश आमटे (जन्म इ.स. १९७३). नागपूर येथे जन्म. ज्येष्ठ समाजसेविका, आदिवासी संस्कृतीशी समरस होऊन त्यांच्या पुनरुत्थानासाठी दैदीप्यमान कार्य करणाऱ्या प्रतिभासंपन्न लेखिका. वैद्यकीय अभ्यासक्रमात शिकत असताना प्रकाश आमटेंचा परिचय, पुढे विवाहात रूपांतर. आदिवासींच्या जीवनात परिवर्तनाचा प्रकाश पेरणाऱ्या 'लोकबिरादारी' प्रकल्पाच्या संचालिका. आदिवासींची भाषा व त्यांच्या संस्कृतीशी एकरूप होऊन सेवा करणाऱ्या डॉक्टर, वैयक्तिक आयुष्य सामाजिक कार्यात समर्पित करणाऱ्या कार्यकर्त्या. 'रॅमन मॅगसेसे' पुरस्कार (२००८) व इतर अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित.*

*प्रस्तुत लेखात लेखिकेने साधनाताई आमटे यांच्या जीवनातील चढ-उताराचे, कडक शिस्तीचे, 'फरगेट' आणि 'फरगीव' या तत्त्वज्ञानाचे वस्तुनिष्ठ वर्णन केले आहे. तसेच कौटुंबिक जिव्हाळ्याचे दर्शन घडविले आहे.*

---

आमचं लव्ह मॅरेज झालं. माझं लग्न ठरलं तेव्हा प्रकाश लहान होता; तर विकास मोठे होते. त्यामुळे मोठ्या भावाच्या आधी लहान भावाचं लग्न कसं करायचं, हा प्रश्न निर्माण झाला होता. याबाबतीत ताई (साधनाताई) फार कडक विचारांच्या होत्या. पारंपरिक मतं बाळगणाऱ्या होत्या. आधी मोठ्या मुलाचं आणि नंतर लहान मुलाचं लग्न व्हावं, ही त्यांची इच्छा होती. त्यामुळे आमच्या (मी आणि प्रकाश आमटे) लग्नाच्या संदर्भात त्या थोड्या नाराजच होत्या. आपली सून आपल्या मुलांपेक्षा वयाने मोठी असणं, हेही त्यांच्या मनाविरुद्धच होतं. त्यांच्या मनाची अवस्था दोलायमान झाली. त्यात प्रकाशचाही भटजी वगैरे प्रकारांवर विश्वास नव्हता. तेही ताईंना पटणारं नव्हतं; परंतु, बाबा (ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे) पुरोगामी विचारांचे होते. बाबांना विरोध करायचा नाही, त्यांच्या विचारांना साथ द्यायची, म्हणून ताई आनंदानं आमच्या लग्नात सहभागी झाल्या. लग्नात आपण नाराज आहोत, हे ताईंनी कुठंही दिसू दिलं नाही.

मात्र, लग्नानंतर त्यांना माझी फार काळजी वाटायची. मी आणि प्रकाश तरुण वयात हेमलकशासारख्या जंगलात येऊन राहिलो. आपण आपल्या तरुण



Scanned with OKEN Scanner

सुनेला जंगलात टाकलं, याची ताईंना फार बोच वाटत होती. हेमलकशात रस्ते नव्हते. पाण्याची काही सोय नव्हती. शौचालय आणि बाथरूमचाही पत्ता नव्हता. इतर कोणत्याही सुविधा नव्हत्या. आम्ही हेमलकशात अक्षरश: झोपड्या बांधून राहिलो. सर्व कार्यकर्ते एकत्र राहायचो.

संसार म्हणून नव्हताच. अशा वातावरणाची मला तरी अजिबात सवय नव्हती. अशा 'मोठ्या कुटुंबा'त राहणं हे माझ्यासाठी अगदीच नवीन होतं. त्यामुळं इथला वावर माझ्यासाठी सोपा नव्हता आणि या सगळ्यांची जाणीव असल्यानं ताईंना माझी खूपच काळजी वाटत असे. हेमलकशात राहताना बाहेर आमचा कुणाशीही संपर्क नसायचा. पावसाळ्यात नद्या भरल्या, की सर्व प्रकारचा संपर्क तुटायचा. आनंदवनात किमान काही सुविधा तरी आहेत; पण हेमलकशात काहीच नाही. आपण सर्व सुविधा भोगत आहो आणि नवीनच लग्न झालेल्या आपल्या सुनेला आणि मुलाला कोणतीच सुविधा नाही, याचं ताईंना फार वाईट वाटायचं. त्यांना त्यांचंच मन खात असे. त्यामुळे हेमलकशात जोपर्यंत वीज नव्हती, तोपर्यंत ताईंनीही कधी पंखा वापरला नाही.

इथं हेमलकशात येऊन आम्हाला भेटण्यासाठी ताईंची खूप धडपड असायची. मग त्यांनी एक नियमच करून घेतला. दरवर्षी गणपतीच्या सुमारास आम्हाला भेटण्यासाठी त्या तरुण कार्यकर्त्यांना सोबत घेऊन यायच्या. आलेपल्लीपर्यंत गाडी घेऊन यायच्या. तेथून मात्र साठ किलोमीटर पायी येण्याशिवाय पर्याय नसायचा; पण त्या यायच्या. बाबा फार फिरायचे नाहीत; पण कधी कधी तेही ताईंसोबत अर्ध्या अंतरापर्यंत येत असत. आमच्या संसारासाठी म्हणून ताई बरेच साहित्यही सोबत घेऊन येत असत. कणकेसारखं व इतर नित्योपयोगी साहित्य ताई आणता येईल, तेवढं घेऊन यायच्या. खूप सारा भाजीपालाही आणायच्या. ताईंना घ्यायला आम्ही जायचो; मग आम्ही सर्व जण सोबत पायी यायचो. एकदा आम्हाला डोळे भरून पाहिल्यावर ताई परत पायीच जायच्या. त्या वेळी अनेक गोष्टींची देवाणघेवाण होत असे. तिकडील सर्व हालहवाल आम्हाला कळायचे. ताईंच्या मार्फतच नातेवाइकांविषयी कळायचं. कारण इतर वेळी आमचा कुणाशी संपर्क होणंच शक्य नव्हतं. ताई आल्या की आम्हाला दिवाळीच वाटायची. ताई दरवर्षी यायच्या. नातवंडं झाल्यावर तर कसंही करून यायच्याच. नातवंडांना डोळे भरून पाहिल्याविना त्यांना बरंच वाटायचं नाही.

ताईंचा देवावर प्रचंड विश्वास होता. त्या खूप उपासतापास करायच्या. या गोष्टींना बाबांचा नेहमीच पाठिंबा नसायचा; पण त्या या बाबतीत कणखर होत्या. मग बाबांनी पण विरोध सोडला. मुलंही नास्तिकच होती. त्यांना देव वगैरे पटत नसे; पण ताईंसाठी सगळी कामं ते करायचे. ताईंना बेलाचे खूप वेड होते.



Scanned with OKEN Scanner

श्रावणात त्या महादेवाला बेलाचं लक्ष वाहायच्या. त्यांच्या या कामात मुलं तर मदत करायचीच; पण सर्व जाती-धर्मांचे लोकही मदत करायचे. या लोकांनी आणून दिलेल्या दूर्वा किंवा इतर कोणतेही साहित्य ताईंना चालायचे. त्यांनी माणुसकी हाच धर्म स्वीकारला होता. त्यामुळे सर्व धर्मांच्या प्रार्थना त्या म्हणायच्या. ताई ईद व ख्रिश्चनांच्याही सणांमध्ये सहभागी व्हायच्या. त्यांचा प्रसादही खायच्या. त्यांनी देव एकच मानला होता. त्यामुळे त्या सर्वांमध्ये मिसळून राहायच्या.

'गोकुळ'च्या पोरांवर त्यांनी खूप प्रेम केलं. काही मुली तर त्यांनी घरी स्वत: वाढवल्या. 'गोकुळ'मधील अनाथ मुलांना तर त्या अंघोळ घालायच्या. स्वत: त्यांचं मालीश करायच्या. स्वत: त्यांची आई होऊन आपल्या हातांनी त्यांच्यासाठी फराळ करायच्या आणि त्यांना खाऊही घालायच्या. हेमलकशात शिक्षणाची फार सोय नव्हती. माझी दोन्ही मुलं आनंदवनात वाढली. ताईंनी आनंदवनात माझ्या पोरांना वाढवलं. त्यांच्याकडून सगळं करून घेतलं. साधनाताईंनीच माझ्या मुलाचं सगळं काही केलं. त्यामुळे मुलांनाही आजीबद्दल फार प्रेम वाटायचं. नंतर त्यांचा देवावरील विश्वास नातवांना पटेना. ताईंच्या मुलांचाही देवावर विश्वास नव्हता आणि नातवांचाही नव्हता. त्यावरून कधीकधी आजी-नातवांचे हलके खटकेही उडायचे.

ताईंचा पारंपरिक गोष्टींवर विश्वास होता; पण बाबांच्या पुरोगामी विचारांसाठी त्या अनेकदा आपले म्हणणे बाजूला ठेवत असत. बाबांनी जाण्यापूर्वीच सांगून ठेवलं होतं की, माझी तेरवी वगैरे काही करू नका; तसंच पर्यावरणाला त्रास नको म्हणून माझं दफन करा. त्यानुसारच सारं काही करण्यात आलं. शेवटच्या दिवसांत ताईंनीही सांगून ठेवलं होतं की, 'माझंही बाबांजवळच दफन करा. म्हणजे जागा देखील जास्त अडणार नाही.' ताईंच्या माहेरी यज्ञ वगैरे फार धार्मिक गोष्टी चालायच्या. ताईंचीही या गोष्टींमध्ये श्रद्धा होती. पण त्या बाबांच्या विचारांशी एकरूप झाल्या.

### 'आनंदवना'तील जोडप्यांची लग्नं

'आनंदवना'त अनेकांचे प्रेम जुळायचे. लग्न करण्याचा निर्णय घेऊन अशी जोडपी बाबांकडे यायची; पण बाबा त्यांना लग्नासाठी परवानगी देत नसत. कारण त्या वेळी लेप्रसीबाबत फारशी माहिती नव्हती. तो संसर्गजन्य असतो, असंच सर्वांना वाटायचं. बहुतेक लोकांना या रोगाची किळसही वाटत होती. त्यामुळं अशा जोडप्यांची लग्नं झाल्यास त्यांच्या पोरांपुढंही किळसवाणं जीवन येईल, त्यांचा सांभाळ कोण करणार, अशा गोष्टींचा विचार करून बाबा त्यांना लग्नाला परवानगी देत नसत; पण ताई त्या वेळी बाबांशी भांडत. 'किमान या



Scanned with OKEN Scanner

लोकांना सहजीवन तरी जगू द्या', अशी मागणी करीत. शेवटी बाबांनी ते मान्य केलं. 'आनंदवना'त लग्नं होऊ लागली. त्या जोडप्यांना मुलं मात्र होऊ दिली जात नसत. 'आनंदवना'तील लोकांना सोबत मिळाली. हे ताईंच्या प्रयत्नातून झालं.

**भरपूर वाचन**

ताईंचं वाचन भरपूर होतं. ताई हुशार होत्या. वडील लवकर वारल्यानं त्यांना खूप शिकायला मात्र मिळालं नाही. त्यांचं शिक्षण अर्धवट राहिलं; पण ताईंनी वाचनाचा व्यासंग वाढवला. त्या कायम वाचत राहिल्या. देवाच्या संदर्भातलं वाचन त्यांना विशेष आवडायचं.

**बाबांसाठी स्वत:त बदल**

ताईंना दागिन्यांचा अजिबात सोस नव्हता. लग्नाआधी त्या खूप भारी कपडे घालायच्या; पण बाबांना आवडायचं नाही म्हणून त्यांनी स्वत:त बदल करून घेतला. बाबा खादी घालतात म्हटल्यावर ताई स्वत:ही खादीचे कपडे घालायच्या. कपडे धुण्यापासून सर्व कामे त्या स्वत: करायच्या. 'आनंदवना'त राहताना मुलांना मित्र नसायचे, याबाबत मात्र त्यांना फार वाईट वाटायचं. तसं बाबांच्या घरी काही कमी नव्हतं; पण समाजसेवेमुळं बाबांची आर्थिक स्थिती बरी नसायची. साधं बिस्किट आणणंही ताईंना कठीण वाटायचं.

**दहा रुपये वाचवा**

आपल्याला जे काही मिळतं, त्यातले दहा रुपये बाजूला ठेवा, असं ताई नेहमी सांगत असत. आपल्याला कधीही कुणापुढं हात पसरायची वेळ येऊ नये, असं त्यांचं म्हणणं होतं. ही त्यांची बचतीची शिकवण त्यांच्या स्वानुभवातून आली होती.

**इस्टेट नाकारली; आशीर्वाद घेतले**

ताईंनी जे काही होतं, ते वाटून दिलं. कशाचाही लोभ ठेवला नाही. वडिलोपार्जित शेती, घर त्यांनी चुलत घराण्याला देऊन टाकलं. आमचं नाव त्यातून काढून टाका, असंही सांगितलं. बाबांना न विचारता त्यांनी हे निर्णय घेतले. ताईंनी आणि बाबांनीही कधी आयता पैसा घेतलाच नाही. शेतीदेखील विकून ट्रस्ट करून 'गोकुळ'च्या मुलांसाठी त्यांनी खर्च केला. माहेरच्या इस्टेटीला हात लावला नाही. फक्त आशीर्वाद घेतले.

**'नर्मदा'तील सहभाग**

ताईंना प्रकाश आणि विकासच्या कामांचं फार कौतुक होतं; पण 'आनंदवन' हेच त्यांचं जीवन होतं. बाकी इतर प्रकल्पांत त्यांना तेवढा रस नव्हता. बाबांनी ताईंना न सांगता 'नर्मदा' आंदोलनात भाग घेतला. त्याचं ताईंना वाईट वाटलं.

धक्कादायक वाटलं. 'आनंदवन' सोडण्याचा त्यांनी विचारच केला नव्हता. इथं त्यांचा जीव रमला होता. त्याशिवाय त्यांचं आयुष्यच नव्हतं. तरीही ताईंनी बाबांसाठी नर्मदाकिनारी तब्बल ११ वर्षं काढली. तिथं त्यांना एकटेपणा जाणवायचा. त्याच काळात त्यांनी 'समीधा' लिहिले. बाबा फार फिरायचे नाहीत; पण ताई आंदोलनाच्या ठिकाणीही स्वत: जायच्या.

**बाबांच्या नंतर...**

बाबांच्या आजारामुळंच ताई अधिक देवखुळ्या झाल्या असं वाटतं. आपण बाबांच्या आधी जाणार, असं त्यांना फार वाटायचं; पण झालं उलटच. बाबा आधी गेले. देवानं मला फसवलं, असं त्यांना वाटू लागलं. बाबांशिवाय त्यांचं आयुष्यच नव्हतं. शेवटी तर त्यांना नकोच जगायला, असं वाटू लागलं. त्यांची प्रकृती खालावली. शेवटी त्यांनी खाणं-पिणंही सोडलं.

जाण्याच्या आधी एक महिना त्या दोन-तीन दिवस कोणाशी बोलल्या नाहीत. आम्ही सगळ्यांना बोलावून घेतले. नातीही आल्या. त्या आल्यावरच ताईंनी डोळे उघडले. ताईंना शेवयाची खीर आवडायची. सर्वांच्या आग्रहामुळं त्या दिवशी ताईंनी खीर खाल्ली. नातवंडांना जवळ घेतलं. पंतवंडांना खेळवलं. ताई त्या दिवशी मग सगळ्यांशी बोलल्या. सर्वांची भेट घेतल्यासारखं झालं. त्यानंतर मात्र त्यांनी सगळं खाणं-पिणंच सोडलं.

**अविस्मरणीय मार्गदर्शन**

'आनंदवना'त कुणाची चूक झाली तर ताई खूपच रागवायच्या; पण लगेच काही वेळानं त्यांना प्रेमानं जवळही घ्यायच्या. समजावून सांगायच्या. 'चुका सगळ्यांच्याच हातून होतात. त्या विसरायच्या असतात', असं त्या म्हणायच्या. 'फरगेट' आणि 'फरगीव' हे त्यांचं तत्त्वज्ञान आमच्या कायम लक्षात राहिलं आणि पुढच्या आयुष्यात ते आमच्या उपयोगीही पडेल.

◆◆◆

*संदर्भ : शब्ददीप, ऑक्टोबर २०११.*

3

# ७. झाडं लावणारा माणूस

– मकरंद कुलकर्णी

**परिचय** – *मकरंद मधुकरराव कुलकर्णी (जन्म इ.स.१९७४)*

*लातूर जिल्ह्यातील हसलगण (ता. औसा) हे त्यांचे जन्मगाव. 'महाराष्ट्र टाइम्स' या एका महत्त्वाच्या मराठी वर्तमानपत्रामध्ये विशेष प्रतिनिधी म्हणून कार्यरत. मागील दोन दशकांपासून पत्रकारितेत स्वतःच्या लेखनाची ओळख निर्माण केलेले तरुण पत्रकार. संवेदनशीलता आणि वैचारिकता अशी त्यांच्या लेखनाची प्रधान वैशिष्ट्ये. ग्रामीण विकास, आरोग्यविषयक प्रश्न, पर्यावरण, अर्थविषयक महत्त्वाचे मुद्दे घेऊन त्याआधारे ठळकपणे वार्तांकन आणि लेखन.*

*एखादी व्यक्ती पर्यावरणाचा विचार कृतीमध्ये उतरवित किती मूलभूत, आदर्शवत कार्य करू शकते आणि अशा व्यक्तीच्या कार्याचे पर्यवसान स्वभावतः जणू संस्थेत कसे परावर्तित होते; यासंबंधी व्यापक पर्यावरणभान जागविणाऱ्या या लेखातून समाजात पर्यावरण संवर्धनाचा संदेश पोहचविण्यास मदत होते.*

---

एखादा माणूस झाडं लावतो. कुणी बाग, शेती करून परिसर हिरवागार करतो. पण ४० वर्षे जीवापाड मेहनत करून जर एकट्या माणसाने १४०० एकराहून अधिक क्षेत्रफळावर जंगल उभे केल्याचे आपल्याला सांगितले, तर सहजासहजी विश्वास बसणार नाही; पण आसाममधील ब्रह्मपुत्रा नदीच्या खोऱ्यात एका अवलियाने हे साम्राज्य उभं केलं आहे. ४० वर्षांपासून केवळ झाडे लावणे याच उद्देशाने जीवन जगणाऱ्या या माणसाने 'नई धरती फिर बनेगी' या उमेदीने भारतात जनजागृती निर्माण करणे सुरू केले आहे. ही कहाणी आहे आसाममधील जादव मोलाई पायेंग यांची.

मिशिंग जमातीत जन्मलेले जादव पायेंग हे मूळचे जोरहाट (आसाम) येथील रहिवासी. ब्रह्मपुत्रा नदीची उपनदी असलेल्या भोगदाई नदीच्या काठावर त्यांचे गाव. याच परिसरात मजुली नावाचे बेट आहे. नदीमधील बेटांमध्ये हे मोठे बेट मानले जाते. १९६५ मध्ये या भागात मोठा पूर आला. बेटावरची जंगलसंपदा वाहून गेली. जोरहाटच्या परिसरात असलेली सगळी झाडे पुरात नष्ट झाली. त्यानंतर जादव गावाजवळच्या दुसऱ्या बेटावर पोचले. तिथेही सगळे वाहून गेले होते. गाव ओसाड झाल्याचे पाहून त्यांना दुःख झाले. गावकऱ्यांशी चर्चा केल्यानंतर जादव यांना एका ज्येष्ठाने सल्ला दिला की, 'ओसाड झाल्यामुळे काहीच करता



Scanned with OKEN Scanner

येत नाही, तुला जमले तर झाडे लाव.'

याच वाक्यातून जादव पायेंग यांनी ठरविले, आपण नष्ट झालेली झाडी पुन्हा उभी करायची. वरकरणी हे सोपे वाटत असले, तरी झाडे लावणे हे अशक्यप्राय आव्हान होते. तेही वाळवंटात. परंतु प्रबळ इच्छाशक्ती आणि ध्येयपूर्तीसाठी जादव यांची वाटचाल सुरू झाली. तेव्हा त्यांचे वय होते अवघे सोळा. बांबूची झाडे लावून त्यांनी मजुली बेटावर वृक्षारोपणाची सुरुवात केली. घरी शेती आणि दुग्धव्यवसाय, त्यावर संसार चालत असे. त्यात कुठेही खंड पडू न देता जादव पायेंग यांचे झाडे लावण्याचे काम सुरू झाले. त्यांचा दिनक्रमही फार विचित्र. त्यांचा दिवस पहाटे साडेतीन वाजता सुरू होई. घरातून उठून रोपटे, बिया घेऊन ते निघत. पाच किलोमीटर पायपीट केल्यानंतर नदी लागे. छोट्या होडीतून नदी पार केल्यानंतर पुन्हा काही किलोमीटर चालल्यानंतर झाडे लावण्यासाठी मुक्रर केलेली जागा येई. झपाटून गेल्यागत ते झाडे लावत. दुपारपर्यंत हे काम आटोपले की पूर्वी लावलेल्या झाडांची देखभाल करून घरी परतत. गेली ४० वर्षे या दिनक्रमात खंड नाही.

एक एकरचे जंगल वसविण्यासाठी जादव यांना तब्बल पाच वर्षे लागली. परिस्थितीचा अंदाज आल्यानंतर त्यांनी जमिनीची विभागणी केली आणि वृक्षारोपण सुरू केले. झाडांनी तग धरावा यासाठी ते विशेष काळजी घेत. काही झाडांना कीड लागल्याचे त्यांना एकदा लक्षात आले. ही कीड काढण्यासाठी औषधी कुठून आणायची? पण एका झाडाचे निरीक्षण करताना त्यांना असे लक्षात आले की, विशिष्ट प्रकारच्या मुंग्या ही कीड खाऊन टाकत आहेत. जादव यांच्या चाणाक्ष बुद्धीने ते टिपले आणि दुसऱ्या दिवशीपासून सोबत दोन पिशव्या त्यांनी बाळगल्या. एका पिशवीत रोपटे, बिया तर दुसऱ्या पिशवीत मुंग्या. ज्या झाडांना कीड लागली आहे त्या झाडांवर मुंग्या सोडण्याचे काम जादव यांनी केले. त्यामुळे बहुतांश झाडे कीडमुक्त झाली. कोणतेही समाजोपयोगी काम करताना अडचणी या येणारच, त्याला जादवही अपवाद नव्हते. कुणीतरी वेडा माणूस झाडे लावत असल्याचे गावातील काही समाजकंटकांनी वनखात्याला कळविले. वनखात्याच्या अधिकाऱ्यांनी जादव यांना नोटीस धाडली. जमीन सरकारची, त्यावर जर एखादा माणूस झाडे लावत असेल तर त्यात गैर काय? पण वनखात्याने त्यांना नोटीस पाठवून सरकारी पद्धतीचे दर्शन दिले. परंतु पायेंग यांनी आपले काम थांबवले नाही.

पाहता पाहता झाडे मोठी झाली. आता हे जंगल बंगाल टायगर, गेंडे, गवे, हरीण, हत्ती, माकड, ससे, गिधाडे यांसारख्या अनेक पक्षी-प्राण्यांचे निवासस्थान झालेले आहे. जादव यांच्या कार्याची गावाबाहेर कुणालाच माहिती नव्हती.

२००८ मध्ये जादव पायेंग जगाला माहीत झाले. जितू कालिता नावाचा वार्ताहर एका आसामी भाषेतील मासिकासाठी काम करायचा. तो जोरहाटचा. फोटोग्राफीही उत्तम. त्याला गावकऱ्यांनी जादव पायेंग यांच्या कार्याविषयी सांगितले. जितू जादव यांच्या भेटीला निघाला. जंगलात गेल्यानंतर जादव यांना भेटण्यासाठी गेला असता जादव यांना तो शिकारी वाटला. संवाद सुरू होताना जितू यांच्या मागून एक गवा आला. जादव यांनी भाला फेकून जितूचे प्राण वाचविले आणि दोघांची मैत्री झाली. जादव यांच्या अफाट कार्याची माहिती जगाला कळावी यासाठी जितू कालिता तब्बल तीन वर्षे झटत होते. २००९ पासून प्रयत्न केल्यानंतर २०१२ मध्ये जादव यांनी पहिला फोटो काढू दिला. त्यानंतर जादव यांचे कार्य बाहेर माहीत झाले. हत्तींचा कळप एकदा गावावर चाल करून आला. त्यामुळे रहिवाशांचे नुकसान झाले. गावकऱ्यांनी जादव यांना दोषी ठरविले. मारहाण केली. लोकांनी उद्रेक म्हणून झाडे कापणे सुरू केले. मग मात्र जादव यांनी कडक भूमिका घेतली, आधी मला मारा मग झाडे तोडा, अशी भूमिका घेतली. एका बाजूच्या जंगलाला आग लावली गेली. मग जादव यांनी वनखात्याला कळविले. खात्याचे लोक आले आणि जंगल पाहून थक्क झाले. कारण काही वर्षांपूर्वी इथे ओसाड जमीन होती. आसाम सरकारने गावकऱ्यांना नुकसानभरपाई दिली आणि जादव यांच्या कार्याची प्रशंसा केली. त्यानंतर जादव देशात ओळखले जाऊ लागले. २२ एप्रिल २०१२ रोजी जादव यांचा दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाने सत्कार केला. त्यांना 'फॉरेस्ट मॅन ऑफ इंडिया' हा पुरस्कार दिला. २०१५ मध्ये त्यांना 'पद्मश्री' पुरस्काराने गौरविण्यात आले. ही कथाही मोठी मजेशीर. पुरस्कारासाठी निवड झाल्याचे सांगण्यासाठी जादव यांना संपर्क साधण्यातच केंद्र सरकारचे कित्येक दिवस गेले. कसाबसा संपर्क झाल्यानंतर जादव यांनी 'मला कशाला पुरस्कार देता?' असे विचारले. पद्मश्री पुरस्काराचा बहुमान मिळाल्यानंतर जादव परदेशात ओळखले गेले. एवढे अफाट काम करणारा हा साधा माणूस जगाच्या नकाशावर 'फॉरेस्ट मॅन' म्हणून ओळखला जाऊ लागला. आखाती देशातील शिष्टमंडळ त्यांच्या भेटीला आसाममध्ये आले होते. अमेरिकेतही जादव यांना बोलावले गेले. एप्रिल २०१६ मध्ये त्यांना जर्मनीचे बोलावणे आले होते. जादव यांची पत्नी बिनिता या जोरहाटमधीलच रहिवासी. जादव कुटुंबीयांना दोन मुले, एक मुलगी. एक मुलगी आणि एक मुलगा जादव यांना वृक्षलागवडीत मदत करतात. पूर्वी हे कुटुंब भोगदाई नदीच्या दुसऱ्या तीरावर असलेल्या जंगलात राहत होते. पण आता ते गावात राहतात. पण जादव मात्र जंगलातच बांबूच्या झाडावर निवारा करून राहतात. पायात चप्पल न घालता जंगल पालथे घालण्यातही ४० वर्षांत बदल झालेला नाही.

देशातील प्राथमिक शाळेत प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला एक झाड लावण्याची सक्ती केली, तर आपली नष्ट झालेली संपदा पुन्हा प्राप्त होईल. 'नई धरती फिर बनेंगी,' असा विश्वास जादव व्यक्त करतात. अखेरच्या श्वासापर्यंत झाडे लावणार असल्याचा जादव मोलाई पायेंग यांचा संकल्प निश्चितपणे समाजाला दिशा देणारा आहे. ◆◆◆

*संदर्भ : महाराष्ट्र टाइम्स, ३ जानेवारी २०१६.*

Scanned with OKEN Scanner

# ८. द्योतक

– कृष्णा किंबहुने

**परिचय** – *कृष्णा रवींद्र किंबहुने (जन्म इ.स.१९७७)*

*भारतीय स्तरावरील नव्या पिढीतील जागतिकीकरण आणि एकूण बदलते जागतिक साहित्य यासंबंधी लेखन करणारे महत्त्वाचे चिंतनशील लेखक. मराठीतील कथालेखक, समीक्षक आणि भाषांतरकार म्हणून उत्तम प्रतिमा. मूलत: मराठीतील प्रतिष्ठित नियतकालिकांमधून कथा प्रसिद्ध. शिवाय इंग्रजी, हिंदी, उर्दू, मराठी अशा भाषांमधून परस्परांत पुष्कळ भाषांतरे किंबहुने यांनी केलेली आहेत. सीरियन अरबी मरम अल मसरी कवयित्रीच्या निवडक कवितांची भाषांतरे प्रकाशित. याशिवाय, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या स्नातक विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी व्याकरणाचे पाठ्यक्रमाचे पुस्तकही त्यांनी लिहिले आहे. किंबहुने यांचा 'प्रथमपुरुष आणि भूमिती' हा कथासंग्रह प्रसिद्ध आहे.*

*प्रयोगशीलता, भाषावैशिष्ट्ये आणि प्रगल्भ अनुभवांची मांडणी यामुळे त्यांचे कथालेखन लक्षणीय ठरते.*

*प्रस्तुत कथेतून भारतीय समाज व्यवस्थेतील बदलत्या मानवी जीवनमूल्यांचे प्रत्यंतर घडते.*

---

दिवस लवकर लवकर जात नाहीयेत हे कळल्यावर आहोजाहोंना सगळंच स्वत:च्या गोंधळण्याइतकं अवघड वाटायचं आणि दिवस लवकर लवकर जातायत हे कळल्यावर सगळंच अगंतुगंच्या हसण्याइतकं सहज वाटायचं.

आहोजाहो आता इतके वयात आले होते की, कोणाशीही कोणत्याही विषयावर काहीही माहिती नसताना बोलू शकत होते. म्हणजे पानवाल्या मित्रांशी राजकारणावर काही माहिती नसताना, रिक्षेवाल्या मित्रांशी इतर शहरांच्या तुलनेत आपल्या शहराचे रस्ते किती खराबयत याबद्दल काही माहिती नसताना, डॉक्टरांशी पर्यावरण आणि आपली प्रकृती याबद्दल काही माहिती नसताना ते सहज बोल शकत होते.

आहोजाहोंच्या घराच्या डाव्या बाजूला अगंतुगंच घर आणि उजव्या बाजूल चांगलं जगायला सांगणाऱ्या काकाचं घर होतं. मधोमध आहोजाहोंचं घर. अगंतु तर आहोजाहोंच्याच वयाची! ती त्यांच्या वर्गातच होती. ती आहोजाहोंची मैत्रिण नव्हती, फक्त ओळखीची होती. म्हणजे कुठेही अगंतुगंला वीस रुपयांची



Scanned with OKEN Scanner

गरज पडली असती तर आहोजाहोंनी चट्कन दिले असते पण शंभर-दोनशे रुपयांची गरज पडली असती तर आहोजाहोंनी विचार केला असता, अशी ओळख. चांगलं जगायला सांगणारे काका तर दोघांचेही जवळजवळ मित्रच होते. चांगलं जगायला सांगणाऱ्या काकांना टीव्ही घ्यायचा होता तेव्हा आहोजाहोंनी टीव्हीबद्दल काही माहिती नसताना खूप माहिती सांगितली होती. तसंच फ्रिजबद्दलही. आज आहोजाहो आणि अगंतुगं दोघांचीही वार्षिक परीक्षा होती. दोघंही चांगलं जगायला सांगणाऱ्या काकांना भेटून अर्धातास अगोदरच कॉलेजमध्ये गेले होते. दोघांशीही काकांनी शेक हँड केलं होतं. अगंतुगंला आनंद झाला. वर्गात आहोजाहोंच्या पाठीमागच्या बाकावरच अगंतुगंचा नंबर होता. म्हणून अगंतुगंला आनंद झाला. आहोजाहोंना वाटलं परीक्षा म्हटल्यावर हे चालायचंच, त्यात काय. थोड्याच वेळात सर आत आले. त्यांनी प्रामणिकपणे आधीच सांगितलं, ''तुम्ही पेपर लिहिताना मला अजिबात घाबरु नका. तुमचं तुमचं चलू द्या. फक्त गोंधळ नको. मला दम्याचा त्रास आहे.'' हे ऐकून सगळे आनंदात एकमेकांकडं पाहात हसू लागले. त्यात अगंतुगंही. आहोजाहोंना हसता येईना. आहोजाहो गोंधळले. थोड्याच वेळात लिहीणं चालू झालं. अगंतुगंनं आहोजाहोंच्या पाठीला हात लावला. आहोजाहो मागं वळले. अगंतुगं म्हणाली, ''गाळलेल्या जागा भरा ची उत्तरं सांगा. पाचीही लवकर लवकर सांगा.'' आहोजाहो लपतछपत उत्तरं सांगू लागले. मधेच अगंतुगं म्हणाली, ''घाबरताय कशासाठी?'' आहोजाहो गोंधळले. आहोजाहोंनी सरांकडं पाहिलं. सर त्या दोघाकडं पाहात मस्त हसत होते. हातानंच खूणा करत ते 'चलू द्या, चलू द्या' असं सूचवत होते. आहोजाहोंनी पाचीही उत्तरं सांगितली. अगंतुगंनं जवळजवळ अर्धा पेपर आहोजाहोंना विचारून लिहिला. पेपर संपल्यावर अगंतुगं आहोजाहोंकडे पाहून हसली. आहोजाहो गोंधळले. आहोजाहोंना ती निर्लज्ज वाटली. आहोजाहोंनी ठरवलं की, आज सगळं चांगलं जगायला सांगणाऱ्या काकांना सांगायचं. आहोजाहोंनी चांगलं जगायला सांगणाऱ्या काकांना परिक्षेत काय काय झालं ते सांगितलं. अगंतुगंनं आपलं पाहून लिहिलं हेही सांगितलं. अगंतुगं समोरच बसली होती. ती पुन्हा हसली. आहोजाहो पुन्हा गोंधळले. चांगलं जगायला सांगणारे काका आहोजाहोंना म्हणाले, ''संतापू नका. शांत राहा. प्रयत्न करा. चांगलं जगा.'' आहोजाहो शांत बसले. पण आहोजाहोंना हे दाखवून द्यायचं होतं की आपण संतापू शकतो, बेभान होऊ शकतो, अपलं रक्त तरुणाचं आहे, सळसळतं आहे, आपण अगदी काळाबरोबर आहोत, काळाबरोबर आपण बदलतो आहोत. पण चांगलं जगायला सांगणारे काका आहोजाहोंना एकदाही असं म्हणाले नाहीत की, 'शांत राहा, तुमचं रक्त सळसळतं आहे. तुम्ही तरुण आहात.' काका फक्त शांत रहाच

म्हणाले. तेच आहोजाहोंना आवडलं नाही. आहोजाहोंनी ठरवलं की, कधीनाकधी आपण दाखवूच की आपलं रक्त सळसळतं आहे. घरी कधीकधी आहोजाहो स्वत:लाच बजावायचे, ''तुम्ही शांत बसा. तुम्ही तरुण आहात. तुमचं रक्त सळसळतं आहे. भावनेच्या भरात काहीही करून बसाल.''

परीक्षा संपली. एकमेकांना विचारून, एकमेकांचं पाहून, गाईड्सच्या कात्रणातलं पाहून लिहीणं संपलं होतं. आहोजाहोंना समाधान झालं. पण एवढं सगळं संपलं तरी त्या सरांचा दमा आयुष्यभर तसाच रहाणार होता याचं आहोजाहोंना वाईट वाटलं. कारण त्या सरांना दमा बरा करायला कॉपी करता येणार नव्हती. परीक्षा संपल्यानंतर घरी जाताना आहोजाहोंनी त्या सरांना स्वत:च्या स्कूटरवर लिफ्ट दिली. आणि जाता जाता, 'मी अमुक अमुक ठिकाणी राहातो, आता तुम्हाला सोडून घरीच जाणाराय, घरी गेल्यावर जेवण करून झोपणाराय, ही स्कूटर वडीलांनी खास माझ्यासाठी घेतलीये' इतकं सगळं सांगितलं. त्यामुळे त्या सरांना काहीच बोलता आलं नाही. ते फक्त म्हणाले, ''तुम्ही स्कूटर छान चालवता.'' त्या सरांना सोडून आहोजाहो पानवाल्या मित्राकडे गेले. पानटपरीसमोर स्कूटर लावून आहोजाहो काऊंटरवर रेलून उभे राहिले आणि पानवाल्या मित्राला म्हणाले, ''गुरुदेव, एका ज्योतिष्यानं आम्हाला २००३ साली वेड लागेल म्हणून सांगितलंय.'' पानवाला मित्र म्हणाला, ''२००३ म्हंजे अजून सात वर्षयत. तोपर्यंत तुम्ही काय काय करायचं ठरवलंय? काळजीनं घ्या या ज्योतिष्यांच्या असल्याच गोष्टी खऱ्या होतात.'' आहोजाहो म्हणाले, ''मीही तोच विचार करतोय की २००३ पर्यंत काय करायचं. तुम्ही काही सल्ला द्या.'' पानवाला मित्र म्हणाला, ''मोठ्ठाय प्रॉब्लेम. प्रॉब्लेम मोठ्ठाय, वेड लागल्यावर काय करायचं. हे तेव्हाचं तेव्हा बघता येईल पण वेड लागेपर्यंत काय करायचं हा प्रॉब्लेम मोठ्ठाय, थोडं आधी लागू शकलं असतं वेड तर काही शक्य होतं. पण सात वर्ष म्हंजे कठीणाय.''

पानवाला मित्र काही सल्ला देत नाही हे कळल्यावर आहोजाहो तिथून निघाले. तिथून निघून सरळ चांगलं जगायला सांगणाऱ्या काकांकडं आले. त्यांना आधी सगळं सांगितलं आणि म्हणाले, ''सात वर्ष काय करू? काही प्लॅन सुचवा.'' चांगलं जगायला सांगणारे काका म्हणाले, ''चांगलं जगा, शांत राहा, प्रयत्न करा.'' आहोजाहो म्हणाले, ''वेड लागण्यापूर्वी चांगलं कसं जगता येईल? शांत कसं राहता येईल? लवकर वेड लागावं म्हणून प्रयत्न कसा करता येईल?'' चांगलं जगायला सांगणारे काका म्हणाले, ''वेडबिड काही लागत नाही तुम्हाला. काळजी करु नका.'' आहोजाहो म्हणाले, ''काळजी करत नाहीये वेड लागेल म्हणून. मला काळजी आहे ती येत्या सात वर्षांची १९९६ ते



Scanned with OKEN Scanner

२००३ पर्यंतची.'' चांगलं जगायला सांगणारे काका म्हणाले, ''काही वेड लागत नाही म्हणालोना. मस्त सकाळी उठावं, व्यायाम करावा, दूध प्यावं, वाचावं, गाणी ऐकावीत, चांगले सिनेमे पहावेत. मग कसं लागेल वेड?'' आहोजाहो म्हणाले, ''मला २००३ पर्यंत करमणूक हवीय. पण स्वत:कडूनच. सिनेमा-नाटक-गाण्यांतून नको. डोक्यात जे विचार असतात त्यांनाच दिशा मिळवून द्यायची, त्यातच लय निर्माण करायची. ते जमत नाहीये. कसं जमेल.'' चांगलं जगायला सांगणारे काका म्हणाले, ''चांगलं जगा, शांत रहा, प्रयत्न करा...'' चांगलं जगायला सांगणाऱ्या काकाचं वाक्य अर्धवट तोडून आहोजाहो म्हणाले, ''व्यायाम करा, दूध प्या, मस्त सकाळी उठा, वाचा गाणी ऐका, सिनेमे पहा.'' त्यानंतर एवढं बोलून आहोजाहो तिथून निघून गेले. पण एवढी चिडचिड करुनही चांगलं जगायला सांगणारे काका आहोजाहोंना 'सळसळत्या रक्ताचा तरुण' म्हणालेच नाहीत. संध्याकाळी अगंतुगं भेटली. निवांत होती. केस मोकळे सोडून उभी होती. हसत होती. आपण सुडौल आणि शिवाय आकर्षकही आहोत याची खात्री तिच्या चेहऱ्यावर दिसत होती. आहोजाहो तिच्याजवळ गेले. तिलाही सगळं सांगितलं. ती म्हणाली, ''२००३? म्हंजे आत्ता कुठलं साल चाल्लाय? आणि किती वर्षयत २००३ ला? आहोजाहो म्हणाले, ''सध्या १९९५ चा डिसेंबर महिना चाल्लाय, म्हंजे जवळजवळ १९९६ सुरूच!'' अगंतुगं म्हणाली, ''हॅऽऽ! म्हणे १९९६ सुरूच! अजून मला ३१ डिसेंबरची रात्र मैत्रिणींबरोबर साजरी करायचीय. मस्त मज्जा. आम्ही आइस्क्रीम खाणार आहोत.''

आहोजाहो म्हणाले, ''आईस्क्रीम मी तुला आत्ता खाऊ घालतो पण तू मला सात वर्ष काय करावं याबद्दल काही सुचव.'' अगंतुगं म्हणाली, ''मी कसं सांगू?'' आहोजाहो म्हणाले, ''तू न सांगणं हे चूकय. परीक्षेत सगळ्या पेपर्सची पुष्कळ उत्तरं मी तुला सांगितलीयत. आता तू मला हे सांग.'' अगंतुगं म्हणाली, ''हे वेगळं आणि ते वेगळं. ३१ डिसेंबरला तुमचा काय प्लॅन? तुम्ही दारूच पिणार असाल, नाई?'' आहोजाहो म्हणाले, ''३१ डिसेंबरला माझा काहीही प्लॅन नाहीये. मी दारू पिणार नाई. चल सुचव सात वर्षांबद्दल.'' अगंतुगं म्हणाली, ''उद्या सांगते, उद्याच बोलू.'' आणि भराभर चालत निघून गेली. आहोजाहोंना वाटलं, आता ही उद्या काय सांगेल?

घरी येऊन आहोजाहो जेवण करत बसले. सात वर्ष जेवत बसता येणार नाही हे, कळल्यावर आहोजाहो घराच्या अंगणात आले. नेहरू शर्ट आणि पायजामा घातलेला एक माणूस आहोजाहोंच्या घराकडं चालत येत असलेला त्यांना दिसला. मधेच स्वत:च्या कपाळावरुन हात फिरवत तो स्वत:शीच म्हणाला, ''कपाळ कसं पायजे? भऽऽव्य'' तो सारखं सारखं तेवढंच म्हणत निघून गेला?



Scanned with OKEN Scanner

आहोजाहोंना वाटलं आपणही आज रात्रभर असंच फिरू, फिरता फिरता स्वत:शीच म्हणू, "सात वर्ष कशी पायजे होती? छोटी छोटी. सात वर्ष कशी पायजे होती? छोटी छोटी."

झोपताना आहोजाहोंना वाटलं रिप व्हॅन विंकल जसा वीस वर्ष झोपला तसं आपण सात वर्ष झोपू आणि झोपेतून उठू तेव्हा आपल्याला वेड लागलेलंच असेल मस्तपैकी.

दुसऱ्या दिवशी अगंतुगं भेटली. भेटल्या भेटल्या आहोजाहो तिला म्हणाले, "चल सांग, काय करु मी सात वर्ष, तू सांगते म्हणाली होतीस." अगंतुगं म्हणाली, "नाई पण मला आज तुमच्याशी दुसरंच बोलायचं होतं."

आहोजाहो म्हणाले, "बोल चट्‌चट्."

अगंतुगं म्हणाली, "मला भीती वाटतेय."

आहोजाहो म्हणाले, "भिऊ नकोस बोल."

अगंतुगं म्हणाली, "मला तुम्ही फार आवडता. तुमच्यासारखाच नवरा मिळायला पायजे असं मला वाटतं." आहोजाहो म्हणाले, "हे सांगण्यात भ्यायसारखं कायाय?" भ्यायसारखी आहेत सात वर्ष बोल, काय करू सात वर्ष? अगंतुगं म्हणाली, "तुम्ही मला फार आवडता." आहोजाहो म्हणाले, "आवडून घेण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. कधीकधी नावडती गोष्टसुध्दा. ही गोष्ट आपल्याला आवडत नाही म्हणून आवडू शकते. जसं चांगलं जगायला सांगणाऱ्या काकाचं आहे. ते माझ्या शेजारी राहतात म्हणून मला आवडत नाहीत. पण ते माझ्या घरात येऊन राहात नाहीत म्हणून मला आवडतात की!" अगंतुगं म्हणाली, "आपण एकत्र हिंडू, एकत्र फिरू." आहोजाहो म्हणाले, "इतकं सगळं एकत्र करायला तू माझा, एखादा अवयव थोडीचयस. तू मला फक्त सात वर्षांबद्दल सांग. नाहीतर मग सात वर्ष मला तोंड दाखवू नकोस." अगंतुगं चिडून म्हणाली, "तुमचं हे फार वाईटाय. 'बाप दाखव नाही तर श्राध्द कर' हे काय कामाचं." अगंतुगंच्या या वाक्याला आहोजाहो खळखळून हसले. 'बाप दाखव नाही तर श्राध्द कर' हे वाक्य पुन्हा पुन्हा म्हणत हसत निघून गेले. आहोजाहो पानवाल्या मित्राकडे आले. पानवाला मित्र म्हणाला, "या, या. तुमच्या प्रश्नाचं पंचवीस टक्के उत्तर मी शोधलं बघा म्हणजे असं की रोज संध्याकाळी मी तुमच्याशी ६ ते १० या वेळात मनसोक्त गप्पा मारु शकतो. अगदी मला अजून सात वर्ष आयुष्य आहे असं गृहित धरून." आहोजाहोंना ही गंमतच वाटली. ज्याची खात्री नाही ते पक्कं समजूनच गृहित धरायचं आणि ज्याची खात्री आहे, ते सहजासहजी लक्षात येईलच असं नाही. म्हणजे उदाहरणार्थ, पानवाल्याकडून पान खाताना आपल्याला घरच्या तव्याची आठवण येत नाही



Scanned with OKEN Scanner

पण घरी तवा आहे याची खात्री असतेच. आहोजाहोंना एकदोन दिवस या गंमती पुरेशा होत्या. पहिली 'बाप दाखव नाही तर श्राध्द कर' ची आणि दुसरी खात्री असण्यानसण्याची. पण आपल्या वेडाचं तसं काही नाही याची जाणीव आहोजाहोंना होती. कारण ज्योतिष्यानं सांगितलेलं फक्त गृहित धरण्यासारखं होतं. पण कधीनाकधी वेड लागायची पाळी आपल्यावर येणार आहे याची त्यांना खात्री होतीच. सात वर्षांच्या प्रश्नानं आहोजाहो फार अस्वस्थ झाले. त्यांना वाटलं आपण त्या सरांकडे जावं. ते काहीनाकाही सांगतीलच. परीक्षेत जसे ते सहज कॉपी करु देत होते. तसेच ह्या प्रश्नासाठीही काहीतरी मार्ग सांगतीलचं. त्यांच्याकडे जाऊन आपण त्यांना सगळं सांगू असं मनात आल्यावर आहोजाहो स्कूटरवर बसून लगेच त्या सरांकडे गेले. ते सर घरात फक्त चड्डी आणि बनियन घालून बसले होते. आहोजाहो त्यांना म्हणाले, "नमस्कार सर." सर म्हणाले, "नमस्कार. तुम्ही कसेकाय आलात अचानक. यंदा पेपर तपासायला मी जाणार नाही. आणि पेपर तपासणारे कोणीच माझ्या ओळखीचेही नाहीत. तुम्ही उगीच आलात. तुम्हाला ही साधी माहिती मिळायलाच पायजे होती. असे कसे विद्यार्थी तुम्ही." आहोजाहो म्हणाले, "नाही, मी तुमच्याशीच खास बोलायला आलोय." सर म्हणाले, "बोला." आहोजाहो म्हणाले, "मला सात वर्षांसाठी मुक्ती पायजेय." सर म्हणाले "मुक्ती?" 'मुक्ती' म्हणाल्या म्हणाल्या आतल्या खोलीतनं एक बॉल आला आणि सरांच्या डोक्यात लागला. बॉल मागोमाग एक छोटा मुलगा पळतपळत आला आणि सरांना म्हणाला, "द्या, द्या बॉल द्या इकडं." सरांनी मुलाला चुपचाप बॉल दिला आणि म्हणाले, "सावकाश खेळा. पुन्हा इकडं बॉल आला तर देणार नाई." मुलगा 'हॅं हॅं' करत हसत निघून गेला. सर लाजून आहोजाहोंना म्हणाले, "हे आमचे सर्वात धाकटे चिरंजीव. ते असे वागतात की जसे काही ते खरोखरच चिरंजीव आहेत." मग सर म्हणाले, "मुक्ती कशी पायजे तुम्हाला?" आहोजाहो म्हणाले, "मला एका ज्योतीष्यानं सात वर्षात तुम्हाला वेड लागेल असे सांगितले, म्हंजे १९९६ पासून २००३ पर्यंत मी काय काय करु याबद्दल काही सुचवा. मी सिनेमे-नाटकं, टीव्ही पाहाणार नाही. माझ्या डोक्यातल्या विचारांशीच मला खेळायचय, जमत नाही. तुम्ही सुचवा काहीतरी." सर म्हणाले, "अहो, पण त्या ज्योतिष्याचं खरं काय म्हणून समजायचं, तो उद्या काहीही सांगेल." आहोजाहो म्हणाले, "ज्योतिष्याचं खरं नसेलही पण माझा अंदाज तर खरा आहे की नाही." सर म्हणाले, "म्हंजे काय?"

आहोजाहो म्हणाले, "अहो सात वर्षांनंतर नाही पण कधीना कधी वेड लागणाराय हे खरंचय की." सर म्हणाले, "तुम्हालाच का म्हणून वेड लागेल, मला का नाही?" आहोजाहो म्हणाले, "तुम्हाला लागलंही असेल वेड. वेड

लागताना तुम्हाला कळलंही नसेल नाई का?'' सर म्हणाले, ''वेड लागताना कळणार नाही असं कसं होईल?'' आहोजाहो म्हणाले, ''नख वाढताना कळतं का, केस वाढताना कळतं का, आत्ता वेड लागायचा योगय असं सांगितलंय म्हंजे २००३ साली या वेळी जर्मनीत नवराबायको शेकोटीजवळ बसलेत हे कळतं का इथे आपल्याला, नाई ना? तसंच वेडाचं.'' सर म्हणाले, ''हो! लागलंही असेल मला वेड. आता. आहोजाहो म्हणाले, ''काहीही करा कारण तुम्हाला फार काही करताच येणार नाई. आता मी काय करू, तुम्ही सुचवा.'' पण मी सात वर्ष काय करू? या सात वर्षात माझं काहीही होऊ शकेल. मी चोर, डाकू, नट, आतंकवादी, आमदार, खासदार काहीही होऊ शकतो. मला तसं काहीही करायचं नाही. मला फक्त माझ्या डोक्यातल्या विचारांना दिशा द्यायचीय, विचारांत लय निर्माण करायचीय.'' सर म्हणाले, ''मी काय करु ते सांगा.'' आहोजाहो म्हणाले, ''मी काय करु ते सांगा.'' सर म्हणाले, ''आधी तुम्ही सांगा माझ्या डोक्यातल्या विचारांशी मला खेळायचं नाई. विचारांना टाळायचंय. कसं टाळता येईल?'' सर काहीच सांगत नाहीत हे कळल्यावर आहोजाहो तिथून उठून चालू लागले. आहोजाहोंना जाताना सर कळवळून म्हणाले, ''जाऊ नका. तुम्ही सांगितलेलं काहीच मला लक्षात ठेवायचं नाही. कसं विसरता येईल?'' सरांचं काहीही न ऐकता आहोजाहो तिथून निघून गेले.

संध्याकाळी आहोजाहो अगंतुगंच्या घरी गेले. अगंतुगंला आश्चर्य वाटलं आणि आनंद तर झालाच. आहोजाहो थोडावेळ बसले. अगंतुगंनं आहोजाहोंना आधी पाणी दिलं. मग चहाबद्दल विचारलं. आहोजाहो नको म्हणाले तेव्हा ती म्हणाली, ''आपण संगमरवरीचं घर बांधू.'' आहोजाहो गप्प बसले. अगंतुगं म्हणाली, ''बैठक छान भारतीय पध्दतीनंच सजवू पण मुलं तीन वर्षांनंतर हं!.'' 'वर्षां'चा उच्चार ऐकल्या ऐकल्या आहोजाहो म्हणाले, ''सात वर्षांबद्दल काय विचार केलासयं?'' अगंतुगं म्हणाली, ''बरं सात वर्षांनी तर सात वर्षांनी माझं तसं काही नाही. सात वर्ष आपणच दोघं संगमरवरी घरात अगदी हक्कानं.'' आहोजाहो म्हणाले, ''माझे सात वर्ष म्हणतोय मी. १९९६ ते २००३ काय करु मी वेड लागेपर्यंत.'' अगंतुगं म्हणाली, ''चांगलं जगायला सांगणारे काका म्हणालेना की तुम्हाला वेडबिड काही लागणार नाही म्हणून आणि तुम्ही सारखं वेड - वेड काय करता वेड्यासारखं.'' आहोजाहो म्हणाले, ''हे वेड्यासारखं नाहीये वेड्यासारखं तर मी अजून सात वर्षांनंतर करेन.''

आहोजाहोंनी मनाशी पक्कं ठरवलं की आता अगंतुगंकडं मुळीच जायचं नाही कारण ती सात वर्षांबद्दल काही सांगत नाही. चांगलं जगायला सांगणारे काकाही सात वर्षांबद्दल काहीच सांगत नव्हते. त्या सरांनीही काहीच सांगितलं



Scanned with OKEN Scanner